मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२३ ■ शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## संक्षिप्त

### मोबाईल आणि लॅपटॉपची चोरी

**दैनिक युवकआधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** सेक्टर 12, कळंबोली येथील घरात प्रवेश करून चोराने मोबाईल आणि लॅपटॉप चोरून नेले. या प्रकरणी 22 एप्रिल रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सौरभ सिंग हे सेक्टर 12, कळंबोली येथे राहत असून 22 एप्रिल रोजी त्यांच्या घरात आरोपीने प्रवेश केला आणि घरातील 26 हजार रुपये किमतीचे 4 मोबाईल, 15 हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेले.

### 52 बॅटऱ्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन बनवेल वार्ताहर :** बॅटरी रूममधून 52 बॅटऱ्यांची चोरी केल्याप्रकरणी अमित सेवेन्द्र त्रिपाठी आणि सुरेश तिवारी (दोघेही राहणार मध्य प्रदेश) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ए एम एल एफ ट्रान्सपोर्ट, पार्किंग यार्ड, कोन फाटा येथे सिक्युरिटी गार्ड अमित त्रिपाठी याच्या ताब्यात एक लाख तीस हजार रुपये किमतीच्या बॅटऱ्या कंपनीच्या मालकाने दिल्या होत्या. यावेळी अमित आणि त्याचा मित्र सुरेश तिवारी यांनी संगनमत करून पार्किंग यार्ड मधून बॅटऱ्या चोरून नेल्या.

### सोन्याची चैन खेचली

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** चाकूचा धाक दाखवून सतरा ग्राम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचून चोरी केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 22 एप्रिल रोजी करण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 22 एप्रिल रोजी पनवेल बाजूने नवीन पनवेल कडे जाताना रेल्वे क्रॉसिंग ब्रिजच्या खालील बोगद्यामध्ये संतोष गुप्ता (राहणार सेक्टर 13, नवीन पनवेल) हे पल्सर मोटरसायकल वरून आले. यावेळी दुसऱ्या मोटरसायकल वरून आलेल्या तीन अनोळखी इस्मानी त्यांना अडवले आणि चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळयातील सोन्याची चैन जबरदस्तीने खेचून चोरी करून ते निघून गेले.

### महिलेचा विनयभंग

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : गाडीची बॅटरी खराब झाली आहे, तुला मी फुकट नवीन बॅटरी घेऊन देतो असे बोलून हाताला स्पर्श करून जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 21 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 21 एप्रिल रोजी सकाळी नऊच्या सुमारास पीडित महिला त्यांच्या चुलत भावाच्या गाडीमध्ये जात होती. यावेळी गाडीची बॅटरी चेक करायला ते पळस्पे फाटा पनवेल येथे बॅटरीच्या दुकानाच्या समोर गाडीची बॅटरी चेक करण्यासाठी थांबले. यावेळी दुकानदाराने बॅटरी चेक करून बॅटरी खराब झाली आहे असे सांगून तुला फुकट नवीन बॅटरी घेऊन देतो असे बोलून महिलेच्या हाताला स्पर्श केला आणि जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### जुगारावर पोलिसांची धाड, दहा जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : सेक्टर 7, खारघर येथील जुगाराच्या अड्ड्यावर धाड टाकत दहा जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात 20 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 20 एप्रिल रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास पाईपलाईन शेजारील झोपडपट्टी परिसरात असलेल्या कच्च्या कापडाच्या शेडमध्ये सेक्टर सात, खारघर येथे आरोपी गुरुनाथ पांडुरंग मोडेकर (कोपरा गाव) आणि जगदीश गोपीनाथ ठाकूर (कोपरा गाव) हे जुगार अड्डा चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला आणि दहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या ठिकाणाहून रोख रक्कम जप्त केली.

# राज्याचे कॉम्प्रेस्ड 'बॉयोगॅस' धोरण जाहीर

## अंमलबजावणीसाठी ५०० कोटींची तरतूद; राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

**मुंबई :** कचरा साठल्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या आणि पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, २०२६ राबवण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी २०२६-२७ या वर्षात ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यामुळे शहरांतील कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणे शक्य होणार आहे.

कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस धोरणाच्या अंतर्गत कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या गरजेनुरूप वापरण्यायोग्य गॅस उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. असे प्रकल्प पीपीपी व हायब्रिड अँन्युएटी तत्त्वावर राबवण्यात येतील. हे धोरण कचऱ्याचे ऊर्जा व खतामध्ये रूपांतर करून रोजगार व संपत्ती निर्माण करणारे आहे.

**सार्वजनिक आरोग्यासाठी हितकारी**

नागरी भागातील कचऱ्याचे विलगीकरण, संकलन, प्रक्रिया आणि स्वच्छ ऊर्जेत रूपांतर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे धोरणाचा



उद्देश आहे. या धोरणाद्वारे कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या उत्पादनाला आणि घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेवरील भार कमी होईल. सार्वजनिक आरोग्यात सुधारणा व हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी झाल्याने वातावरणाची गुणवत्ता वाढेल. जमिनीचा ऱ्हास, वायू प्रदूषण, नागरी कचरा आणि कृषी कचरा स्त्रोतांवर कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस उपक्रमांना प्रोत्साहन देणे, धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

**सार्वजनिक-खासगी भागीदारी, हायब्रिड अँन्युटी मॉडेल**

राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव तर जिल्हास्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील. या समित्यांमार्फत प्रकल्पांची निवड, समन्वय, अंमलबजावणी आणि संनियंत्रण केले जाईल. प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण २०२६ आणि हायब्रीड अँन्युटी मॉडेलनुसार राबवण्यात येणार आहे.

**प्रकल्पासाठी २०० टन प्रतिदिन क्षमेतचा निकष**

कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस प्रकल्पांसाठी किमान २०० टन प्रतिदिन क्षमतेचा निकष ठेवण्यात आला आहे. हे प्रकल्प स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि उपक्रम, खासगी विकासक आणि तेल व वायू वितरण कंपन्यांमार्फत ग्रीनफिल्ड किंवा ब्राऊनफिल्ड स्वरूपात राबवता येतील. ज्या ठिकाणी पुरेसा कचरा उपलब्ध नाही तिथे क्लस्टर-आधारित प्रकल्प तसेच कृषी उत्पादक संस्थांच्या मदतीने कृषीतील टाकाऊ घटकांचे एकत्रीकरण करून प्रकल्प उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे.


# कामोठे प्रभागात अतिक्रमण विरोधात महापालिकेची धडक कारवाई

## अतिक्रमण विभागाच्या वतीने अनधिकृत नर्सरी आणि विक्रेत्यांवर तोडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कामोठे प्रभाग समिती ‘क मार्फत अनधिकृत अतिक्रमण व फेरीवाले यांच्यावर व्यापक स्वरूपात धडक कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार करण्यात आलेल्या या कारवाईत विविध ठिकाणांवरील अनधिकृत स्टॉल, नर्सरी, फेरीवाले व हातगाड्यांवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले तसेच काही ठिकाणी झोपड्या हटविण्यात आल्या.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या असून त्यानूसार कामोठे सेक्टर 19 मधील मारुती स्वीट व चेतक स्वीट परिसरातील अनधिकृत स्टॉलवर कारवाई करून सिलेंडर, शेगडी व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच सेक्टर 7 येथील एमएनआर स्कूल चौकात अनधिकृत फळ विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. कामोठे पोलीस स्टेशन समोर फेरीवाल्यांवरही कारवाई करून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. याचबरोबर सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने व प्रभाग अधीक्षक



दशरथ भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी सेक्टर 19, 25, अक्षर बिल्डिंग परिसर, खान्देश्वर स्टेशन, सेक्टर 21 व सेक्टर 34 येथे अनधिकृत व विनापरवाना नर्सरींवर कारवाई करून संबंधित झोपड्या तोडण्यात आल्या. तसेच खान्देश्वर स्टेशन परिसरात अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. सेक्टर 21 येथे दोन नर्सरींसह भंगार व सायकल विक्रेत्यांच्या झोपड्यांवर कारवाई करण्यात आली. सेक्टर 34 येथे अनधिकृत हातगाडी हटविण्यात आली. तसेच नीलकंठ स्वीट परिसरात अनधिकृत नारळ विक्रेत्यावर कारवाई करण्यात आली. अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरती महापालिकेने तोडक कारवाईचा बडगा उचलला असून यापुढेही अनधिकृत व्यवसायधारकांवर अशाच प्रकारची कारवाई पुढेही सुरू राहील, असे महापालिकेतर्फे सूचित करण्यात आले आहे. प्रभाग समिती ‘ड’ मार्फत नविन पनवेल परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. या कारवाईत सेक्टर 3 येथील अनधिकृत भाजी व फळ विक्रेत्यांकडून माल जप्त करण्यात आला. तसेच सेक्टर 2 व शिवा कॉम्प्लेक्स परिसरातील अनधिकृतरित्या विक्री करणाऱ्या चिकन विक्रेत्यांचे साहित्यही जप्त करण्यात आले.याशिवाय ब्रिजवासी बिकानेर स्वीट येथील सिलेंडर व काउंटर जप्त करून फुटपाथवरील अनधिकृत फळ विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात आली. विचुंबे रोड येथे बसलेल्या फुटपाथवरील भाजी विक्रेत्यांवर कारवाई करून जप्त केलेले कांदे व बटाटे गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले आहेत. सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने यांच्या उपस्थितीत अतिक्रमण पथकाच्या मार्फतही कारवाई करण्यात आली.

# महिला आरक्षण अमलबजावणी मध्ये विलंब, सरकारवर काँग्रेसचे टीकास्त्र



**दैनिक युवक आधार**

**सोनल नलावडे पनवेल वार्ताहर** : महिला सक्षमीकरणाच्या घोषणा करणारे भाजप सरकार प्रत्यक्षात महिलांना न्याय देण्यात अपयशी ठरत असल्याची काँग्रेसच्या प्रदेश सचिव तथा नवी मुंबई कार्यक्रम प्रमुख श्रुती म्हात्रे यांनी केली बुधवारी वाशी येथील पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या, नारी शक्ती वंदन अधिनियम मोठ्या गाजावाजात सादर करण्यात आला असला तरी त्याची अंमलबजावणी जनगणना व मतदार संघ पुनर्रचनेच्या अटीमध्ये अडकवून ठेवली सरकारकडे इच्छाशक्ती असती, तर महिला आरक्षण तात्काळ लागू करण्यात कोणतीही अडचण नसती असे त्या म्हणाल्या, महिलांना त्वरित हक्क देण्याऐवजी अटींच्या नावाखाली विलंब केला जात असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला

**कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी**

देशातील लाखो महिला प्रतिनिधित्व आणि सन्मानासाठी प्रतीक्षा करत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान काँग्रेसचे प्रवक्ते नासिर हुसेन यांनी 2023 मध्ये मंजूर झालेल्या कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली, कायद्याला विरोध नसला तरी स्वार्थासाठी करण्यात येणाऱ्या बदलांना विरोध असल्याचे त्यांनी नमूद केले या पत्रकार परिषदेला नीता लिमये उज्वला साळवे डॉक्टर मनोज उपाध्ये अनवर हवालदार संतोष सुतार आधी उपस्थित होते

# सिल्लोडमध्ये 'वृक्षांजली'तून हुतात्म्यांना वंदन; अजिंठा व पालोद वन विभाग परिसरात दुर्मिळ वृक्षांची लागवड

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून आणि पहेलगाम येथील अतिरेकी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी सिल्लोड येथे अजिंठा वन विभाग आणि सिल्लोड-पालोद सामाजिक वन विभागाच्या नर्सरी परिसरात 'वृक्षांजली' हा उपक्रम राबवण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह-कार्यवाह व अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमातून पर्यावरण संवर्धन आणि राष्ट्रभक्तीचा सुवर्णसंगम पाहायला मिळाला.

हुतात्म्यांचे स्मरण आणि 'ऑपरेशन सिंदूर'चे प्रतीक:

गतवर्षी २२ एप्रिल रोजी पहेलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेल्या भारतीय जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय सैन्याने या घटनेचा प्रतिशोध घेण्यासाठी राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेला समर्पित म्हणून या उपक्रमात 'सिंदूर' वृक्षाची लागवड करण्यात आली. यासह महाराष्ट्राचे राज्यपुष्प 'जारूळ' आणि वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून अधिक ऑक्सिजन उत्सर्जित करणारा 'नांदुरक' या वृक्षांचे रोपण करण्यात आले.






पृथ्वीच्या संवर्धनासाठी आणि हुतात्म्यांच्या बलिदानाला आदरांजली वाहण्यासाठी राबवलेला हा उपक्रम निसर्गप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

या उपक्रमाची तांत्रिक माहिती देताना डॉ. संतोष पाटील म्हणाले की, सिंदूर व जारूळ हे वृक्ष 'नेक्टर प्लांट' (मकरंद देणारे) म्हणून मधमाशांना पोषक आहार पुरवतात. हे वृक्ष 'मॅन फेस बग' (Man-faced bug) या कीटकासोबतच 'ट्राय कलर पिड फ्लॅट', 'टेललेस लाइन ब्ल्यू' व 'कॉमन लाइन ब्ल्यू' यांसारख्या दुर्मिळ फुलपाखरांसाठी पोषक 'होस्ट प्लांट' (यजमान वनस्पती) म्हणून कार्य करतात. या फुलपाखरांचा जीवनक्रम पूर्ण होण्यासाठी या वृक्षांचे अस्तित्व अत्यंत महत्त्वाचे असल्याने, त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

अजिंठा वन विभाग आणि सिल्लोड-पालोद सामाजिक वन विभागाच्या नर्सरी परिसरात संपन्न झालेल्या या उपक्रमात वन परीक्षेत्र अधिकारी संतोष दोडके, वन परीक्षेत्र अधिकारी (सामाजिक-सिल्लोड) अनिल पाटील, वनरक्षक पूजा परदेशी, वनरक्षक गणेश परदेशी उपस्थित होते. याप्रसंगी दीपक सोनार, योगेश शिंदे, शरद चेके, संदीप बोंदरवाल (अनुलोम-जालना), जगदीश कळात्रे (अनुलोम-सिल्लोड), बाबुराव वाघ, भास्कर सहाणे, कुणाल साबळे, कौतिक साखळे व अमीर चावूस आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या वृक्षांच्या संगोपणाची संपूर्ण जबाबदारी वन विभागाने स्वीकारली आहे.

## तोरनाळा जवळ भीषण अपघात; पती–पत्नीचा जागीच मृत्यू, आठ वर्षांच्या मुलाकडून अग्नीदान

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील सावळदबारा गावावर तोरनाळा जवळ घडलेल्या भीषण अपघातामुळे शोककळा पसरली आहे. या दुर्दैवी घटनेत ह.भ.प. वासुदेव महाराज खडके यांचे सुपुत्र गोपाळ वासुदेव खडके (वय ३५ वर्ष) व त्यांची पत्नी सोनाली गोपाळ खडके (वय ३० वर्ष) यांचा जागीच मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास हे दाम्पत्य जामनेरहून सावळदबारा येथे मोटारसायकलने परतत होते. दरम्यान, तोरनाळा परिसरात मागून येणाऱ्या मोटारसायकल ट्रॅक्टरला मागून दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत पती पत्नीचा दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातात त्यांची दीड वर्षांची मुलगी कु. मुक्ताई ही किरकोळ जखमी होऊन थोडक्यात बचावली. वेळ आला होता पण काळ आला नव्हता असे म्हणयाला काही हरकत नाही

घटनेची माहिती मिळताच फत्तेपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश जाधव व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जामनेर येथे पाठविण्यात आले. पोस्टमॉर्टम



पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.दि. २३ एप्रिल २०२६ रोजी गुरुवारी सावळदबारा येथे दुपारी १२ वाजता दोघांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी सर्वांना अंतर्मुख करणारा प्रसंग घडला. अवघ्या सहा वर्षांच्या मुलाने आपल्या आई-वडिलांना अग्नीदान दिले. हा हृदयद्रावक क्षण पाहून उपस्थित नातेवाईक व ग्रामस्थांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले.या दुःखद घटनेमुळे सावळदबारा गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. गोपाळ खडके यांच्या पश्चात आजी,आई-वडील,भाऊ-बहीण, काकू,काका तसेच दोन मुले व एक मुलगी असा मोठा परिवार आहे.दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि अंकुश जाधव हे करत आहेत.

## तूच माझा स्वामी या नाटकाला पनवेल मध्ये तुफान प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/मिलिंद खारपाटील** : ग्रामस्थ मंडळ टाकीगाव तालुका उरण निर्मित, राधाकृष्ण नाट्यमंडळ टाकीगाव तालुका उरण प्रस्तुत , कौटुंबिक जिव्हाळ्याचे,हृदयस्पर्शी, हास्य, करुणरसप्रधान, मनाचा वेध घेणारे एक जबरदस्त, ज्वलंत,भावनात्मक वलय असणारी दोन अंकी सामाजिक नाट्यकलाकृती "तूच माझा स्वामी " बुधवार दिनांक २२ एप्रिल रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे रसिक प्रेक्षकांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडले.

यावेळी माजी आय आर एस अधिकारी श्री सुधाकर पाटील, कामगार नेते मेघनाथ तांडेल, आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक श्री मिलिंद खारपाटील, शिवधन पतपेढी चे संस्थापक गणेश म्हात्रे, चिरनेर येथील नाट्य कलाकार संतोष ठाकूर, वरिष्ठ विस्तार अधिकारी मोहिते



साहेब, नारायणशेठ ठाकूर, दिग्दर्शक जयवंत पाटील, विनोद पाटील,अरविंद तांडेल ,अरुण नाईक,संजय केणी आदी मान्यवर उपस्थित होते.

१९६० पासून सातत्याने सामाजिक, ऐतिहासिक नाटके सादर करून नाटकांची परंपरा कायम ठेवण्याचे काम टाकी गावाने केले आहे.सागर पालकर हे या नाटकाचे लेखक असून निर्मिती प्रमुख अरुण नाईक, नरेश नाईक,सुरज म्हात्रे ,दीपक नाईक, क्रांती जोशी विजय कोळी , माणिक नाईक, भरत पाटील आहेत.

या नाटकात आबा.. श्री नाथा नाईक सर, राजन... केतन नाईक, शिवा..शरद म्हात्रे, बाबुल.. प्रीतेश कोळी, डॉ हसरे.. सु म कोळी गुरुजी, कालिदास.. स ग कोळी सर, मनीष.. ओमकार नाईक, मंगल.. रुपाली रोकडे यांनी उत्कृष्ट रित्या सादर केले आहे.

सर्व कलाकार गावातील असून फक्त एक महिला पात्र मुंबईमधील आहे.स्थायी समिती सदस्य पनवेल महानगरपालिका श्री बबन मुकादम साहेब यांनी विशेष सहकार्य केले.


नाट्यगृह सुरुवातीपासून प्रेक्षकांनी खचाखच भरलेले होते . रसिक प्रेक्षकांच्या टाळ्या आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नाटकामध्ये पुढे काय होणार याची रसिकांना उत्कंठा लागली होती.नाटकाचे दोन अंक पूर्ण होऊन नाटक संपेपर्यंत नाट्य रसिक खुर्चीला खिळून होते.नाटकाचे दिग्दर्शन चिरनेर येथील नटवर्य कैलासवासी नाना पाटील आणि कैलासवासी गोमा ठाकूर यांचे शिष्य सदानंद कोळी आणि जयवंत पाटील यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश पूजनाने झाली.पाहुण्यांच्या स्वागताचे सूत्रसंचालन रंजना केणी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् या राष्ट्रगीताने झाली.

## कंटेनरच्या धडकेत पाणजेची प्रवेश कमान उध्वस्त; जीवितहानी टळली!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : उरणमधील पाणजे गावच्या प्रवेशद्वारावर आज एका कंटेनरने दिलेल्या धडकेत गावची कमान जमीनदोस्त झाली आहे. कळंबोली येथून जेएनपीए कडे निघालेला लिओ ट्रान्सपोर्ट कंपनीचा लोडेड कंटेनर, ज्याचा क्रमांक MH-46-AF-7376 असा आहे, तो चुकीच्या मार्गाने गावात शिरल्याने हा अपघात घडला.

या घटनेचे सर्वात आश्चर्यकारक पैलू म्हणजे पाणजे गावाच्या ज्या भागात अपघात घडला तिथे आसपास कोणतेही अधिकृत कंटेनर यार्ड किंवा गोडाऊन नाही असे असतानाही लिओ ट्रान्सपोर्टचा कंटेनर फुंडे सर्कल वरून वाट भरकटला आणि थेट गावाच्या





दिशेने जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर आला .चालकाच्या बेदरकारपणामुळे आणि चुकीच्या अंदाजामुळे अपघात घडल्याचे समोर आले आहे. कंटेनर लोडेड असल्याने धडक इतकी जोरदार होती की नवीनच बांधलेली कमान रस्त्यावर कोसळली.

सुदैवाने त्यावेळी खाली कोणते वाहन किंवा पादचारी नसल्याने मोठी जीवित हानी ठळली आहे. अन्यथा या बेदरकारपणामुळे निष्पापांचा बळी गेला असता.

कंटेनर चालक फुंडे सर्कलवरून रस्ता भरकटल्याने थेट पाणजे गावाच्या प्रवेशद्वारापाशी पोहोचला. या घटनेची माहिती मिळताच पानजे गावचे सरपंच लखपती पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली सरपंच लखपती पाटील यांच्या माहितीनुसार कंटेनर मालकाने आपली चूक कबूल केली असून झालेल्या नुकसानीची संपूर्ण भरपाई म्हणून ही प्रवेश कमान पुन्हा नवीन बांधून देण्याचे मान्य केले आहे.

उरण मधील अंतर्गत रस्त्यांवर अवजड वाहनांचे अनधिकृत घुसखोरी रोखण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलावीत .अशी मागणी पाणजे ग्रामस्थांकडून केली जात आहे .

## देगलूर महाविद्यालयात रसायनशास्त्र विषयाच्या नविन अभ्यासक्रमावर कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे** : देगलूर स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सर्व बी.एस्सी.तृतीय वर्ष या वर्गासाठी नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे. प्रस्तुत नवीन अभ्यासक्रमावर अध्यापन करणारे प्राध्यापक व रसायनशास्त्र अभ्यास मंडळ यांच्यात सखोल विचारमंथन व्हावे या उद्देशाने स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड, अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित,देगलूर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ एप्रिल २०२६ रोजी नवीन अभ्यासक्रमावर विद्यापीठ स्तरीय एकदिवशीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली आहे.

प्रस्तुत कार्यशाळेत नांदेड,लातूर,परभणी व हिंगोली जिल्ह्यातील रसायनशास्त्र विषयाचे सर्व प्राध्यापक व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व सदस्य सहभागी होणार आहेत.प्रस्तुत कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पा.बेम्बरेकर राहणार असून उद्घाटक म्हणून स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचे मा.प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.कर्मवीर उनग्रतवार,विद्यापिठातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखे अधिष्ठाता,

प्रा.डॉ एम.के.पाटील,अभ्यास मंडळ अध्यक्ष प्रा.डॉ.डी.आर. मुंडे,अभ्यास मंडळ माजी अध्यक्ष प्रा.डॉ.एस. बी.पटवारी,रसायनशास्त्र संकुलसंचालक, प्रा.डॉ टाले आर.एच.,अधिसभा सदस्य,प्रा. डॉ.ए.टी.शिंदे,अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार,सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार,देवेंद्र मोतेवार,गंगाधरराव जोशी, रविंद्रअप्पा द्याडे,चंद्रकांत नारलावार,गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ उपस्थित राहणार आहेत.

प्रस्तुत कार्यशाळेत जास्तीत जास्त पदवी व पदव्युतर प्राध्यापकानी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ,ऊपप्राचार्य डॉ.ए.बी.चिद्रावार,उपप्राचार्य डॉ.एम. एम.चमकुडे,उपप्राचार्य डॉ.व्ही. जी.शेरीकर,पर्यवेक्षक संग्राम पाटील,डॉ राजकुमार पोकलवार,डॉ.विनोद काळे,प्रा. गणेश क्यादारे,प्रा.प्रमोद गुजे,प्रा कपिल तोटावार,प्रा दत्ता पाटील,प्रा.निकिता तोटावार,गजानन गोपतवाड व कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी केले आहे.

## मतदार यादी मॅपींगसाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची थेट मतदारांशी भेट

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी विजय खुडे** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये लवकरच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा होणार असून, त्या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यात मतदार मॅपींगच्या कामाला वेग देण्यात येत आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी आज ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष मतदारांशी संवाद साधत मॅपींगच्या कामकाजाची पडताळणी केली.

जिल्ह्यात मतदार मॅपींगची





प्रक्रिया दिनांक २० जानेवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत ९२-वसमत मतदारसंघात ८७.१७ टक्के, ९३-कळमनुरी मतदारसंघात ९०.२० टक्के आणि ९४-हिंगोली मतदारसंघात ८७.७१ टक्के काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्याचा एकूण प्रगती दर ८८.३६ टक्के असून अद्याप सुमारे १ लाख १४ हजार मतदारांचे मॅपींग बाकी आहे.कामकाजात समाधानकारक प्रगती न झाल्यामुळे ५५ टक्क्यांपेक्षा कमी मॅपींग असलेल्या १२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना नुकतीच कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.मतदार मॅपींग १०० टक्के पूर्ण करण्यासाठी दिनांक २५ व २६ एप्रिल रोजी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या क्षेत्रात दिवसभर काम करून ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, नायब तहसीलदार सिताराम साळसुंदर व मंगला मोरे आदी अधिकारी उपस्थित होते.दरम्यान, मतदारांनी सन २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे किंवा आपल्या पालक/ आजोबांच्या नावाचा तपशील संबंधित केंद्रस्तरीय अधिका-याकडे सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे

## एस.टी. सवलतीसाठी 'स्मार्ट कार्ड'ची सक्ती रद्द करा; शिवसेनेची (उद्धव ठाकरे गट) मागणी

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'महिला सन्मान योजने'अंतर्गत महिलांना प्रवासात सवलत दिली जाते. मात्र, या योजनेसाठी 'स्मार्ट कार्ड'ची सक्ती करण्यात आल्याने ग्रामीण भागातील महिला प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. ही सक्ती त्वरित रद्द करून 'आधार कार्ड'च्या आधारे सवलत सुरू ठेवण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत सिल्लोड आगाराच्या व्यवस्थापकीय संचालकांना सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्य शासनाची महिला सवलत योजना जनहिताची आहे, मात्र स्मार्ट कार्डसाठी आकारले जाणारे २०० रुपये शुल्क आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांवर अन्यायकारक आहे. 'आधार कार्ड' हे अधिकृत ओळखपत्र म्हणून सर्वत्र ग्राह्य धरले




जाते, तेव्हा एस.टी. प्रवासासाठी त्याचा वापर स्वीकारल्यास महिलांची होणारी ससेहोलपट थांबेल. प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, युवा सेना जिल्हा समन्वयक लखन ठाकूर, युवा सेना शहर अधिकारी रामेश्वर इंडोले, उप-तालुकाप्रमुख रामेश्वर जंजाळ, तसेच शिवा गौर, रामेश्वर काळे, सचिन पाटील, अमोल काळे, शंकर रोटे, सोमीनाथ बडक आणि विठ्ठल खिल्लारे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भवानीनगरचे व्यापारी छगनलाल संचेती यांनी 85 व्या वर्षी मतदान

**दैनिक युवक आधार**
**सणसर / विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील भवानीनगर बाजारपेठेतील प्रसिद्ध किराणा मालाचे व्यापारी मा.छगनलाल संचेती यांनी वयाच्या 85 व्या वर्षी मतदानाचा हक्क बजावला. त्यांच्या या कृतीने समाजात प्रेरणादायी संदेश दिला असून वृद्धापकाळातही लोकशाहीप्रती असलेली निष्ठा अधोरेखित झाली.

बारामती तालुक्यातील मारवाडी समाजाच्या वतीने यावेळी जाहीर करण्यात आले की,जास्तीतजास्त मतदान स्व.अजितदादा पवार यांच्या



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवार श्रीमती सुनेत्रावहिनी पवार यांनाच केले जाणार आहे.या घोषणेमुळे समाजात एकात्मता आणि श्रद्धेचा भाव अधिक दृढ झाला. मा.छगनलाल संचेती यांचे जेष्ठ चिरंजीव डॉ.पारस संचेती यांचा भवानीनगर येथे वैद्यकीय व्यवसाय असून त्यांचे कुटुंब बारामती येथे वास्तव्यास आहे. संचेती कुटुंबाच्या या सामाजिक सहभागामुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

85 व्या वर्षी मतदान करून छगनलाल संचेती यांनी लोकशाहीच्या मूल्यांना अधोरेखित केले.त्यांच्या या कृतीने समाजात भावनिक स्पर्श निर्माण केला असून नागरिकांना मतदानाचे महत्त्व जाणवून दिले आहे.

## युवा उद्योजक श्री कपिल आंडे यांचे व्यवसायातून समाजसेवा चे कार्य प्रेरणादायी - माळी समाज ऋणानुबंध च्या वतीने सत्कार संपन्न

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : अमरावती भारतातील सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचे आद्य प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षा निमित्त सर्व शाखीय माळी संघ ऋणानुबंध ह्या समाजसेवी सामाजिक संस्थेच्या वतीने वर्षभर प्रबोधन पर व जनजागृती करणाऱ्या विधायक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.. त्या संदर्भात कठोरा रोड येथे नुकतीच विचार विनिमय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक महासचिव प्रा.श्रीकृष्ण बनसोड, उपाध्यक्ष इंजी.भरत खासबागे, कोषाध्यक्ष ओमप्रकाश अंबाडकर, प्रा. एन. आर.होले, निवृत्त लेखाधिकारी



वसंत भडके, प्राचार्य निळकंठ बोरोळे,महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे महासचिव रवींद्र ढोकणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. माळी समाज ऋणानुबंध परिवाराचे वतीने यशस्वी युवा उद्योजक कपिल सुरेंद्रजी आंडे यांचा पुष्पगुच्छ, फुले दांपत्याची प्रतिमा आणि विचार पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी सत्कारला उत्तर देताना माळी समाज ऋणानुबंध ही सेवाभावी लोक चळवळ असून उपवर युवक - युवतींना योग्य लाईफ पार्टनर मिळवून देणारे एकमेव माध्यम आहे. युवा उद्योजकांच्या कार्याचे कौतुक करणारे व त्यांना प्रोत्साहन देणारे व्यासपीठ असल्याचे म्हटले तर समाजभूषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी माळी समाज ऋणानुबंध हे साता समुद्रापलीकडील युवक युवतींना योग्य जोडीदार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असून युवा उद्योजक कपिल आंडे यांनी जिद्द, चिकाटी व स्वयंप्रयत्नाने व्यवसायात यश संपादन केले असून त्या माध्यमातून समाजसेवा सातत्याने करीत आहेत. त्यांचे हे कार्य युवा पिढीला प्रेरणा देणारे आहे. उद्योजक कपिल आंडे यांचे उद्योजक नंदकिशोर वाठ, र रामकुमार खैरे आदींनी अभिनंदन करून पुढील यशस्वी प्रवासास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त 'गाव तिथे शाखा' स्थापन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेचे सहसाचिव प्रदीप लांडे यांनी केले.

# नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलच्या आधुनिक ट्रॉमा केअर सेंटरचा शुभारंभ

## रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी हॉस्पिटलतर्फे नवी मुंबई पोलिसांना २०० बॅरीकेट्सचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : रस्ते अपघातातील जखमींवर गोल्डन अवरमध्ये प्राण वाचविणारी उपचार यंत्रणा म्हणजेच ट्रॉमा केअर सेंटरच्या हे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी खूप गरजेची आहे. ही बाब लक्षात घेता वाशीच्या न्यूईरा हॉस्पिटलने नव्याने एक पॉली ट्रॉमा केअर सेंटर सुरू केले आहे. उपचारासाठी होणारा विलंब कमी करण्यासाठी आणि त्वरित उपचार मिळवून देण्यासाठी हे केंद्र सज्ज असून यामुळे रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचार मिळण्यास मदत होते.

सेंटरच्या शुभारंभ प्रसंगी श्री. संजय येनपुरे – आयपीएस, सह पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. संजय धार (संचालक, ऑर्थोपेडिक्स विभाग),डॉ. विनोद विज (प्लास्टिक आणि कॉस्मेटिक सर्जन),डॉ. सुनील कुट्टी( न्युरोसर्जन),डॉ. चंद्रशेखर टी(क्रिटिकल केअर मेडिसिन),डॉ. मनीष पेंडसे (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट),डॉ. निशांत तावडे(इंटरनल मेडिसिन एक्स्पर्ट),डॉ. राम खरे(जीआय, लॅप्रोस्कोपिक आणि रोबोटिक सर्जरी),न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष आणि सीईओ डॉ. माताप्रसाद बी गुप्ता उपस्थित होते.

याठिकाणी Triage (ट्रायज) ही आपत्कालीन स्थितीत रुग्णांच्या स्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांना प्राधान्यक्रमाने उपचार देण्याची वैद्यकीय प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपघात, स्ट्रोक, गंभीर दुखापतींसारख्या प्रकरणांमधील रुग्णाला सर्वात आधी प्राधान्य दिले जाते आणि प्रतीक्षा न करता त्यांचे व्यवस्थापन केले जाते. या केंद्राला चोवीस तास उपलब्ध असलेल्या प्रशिक्षित



आपत्कालीन पथकाचे, तसेच अस्थिरोग, सर्जन, मज्जासंस्थेच्या शस्त्रक्रिया, भूलविकार तज्ज्ञ, अतिदक्षता विभाग आणि फिजिओथेरपी तज्ज्ञांचा समावेश आहे.

शहरातील वाढत्या वाहतूक व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी न्यूईरा हॉस्पिटलतर्फे नवी मुंबई पोलिसांना २०० बॅरीकेट्स देण्यात आले. वाशी पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्या उपस्थितीत हे बॅरीकेट्स सुपूर्द करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकारी व रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी आणि रस्त्यांवरील शिस्त राखण्यासाठी या बॅरीकेट्सचा उपयोग केला दाणार आहे.

डॉ. सुनील कुट्टी (संचालक, न्यूरोसर्जन- ब्रेन अँण्ड स्पाईन, न्युईरा हॉस्पिटल) म्हणाले,* आपत्कालीन परिस्थितीत, रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय बऱ्याचदा अतिशय तणावाखाली असतात. अशावेळी वेळ व दवडता उपचार त्वरित सुरू व्हावेत आणि ते सुरळीतपणे दिले जावेत, हे सुनिश्चित करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. ट्रॉमा केअर सेंटरची रचना रुग्णांचे त्वरित मूल्यांकन करणे, त्यांच्या स्थितीनुसार उपचारांना प्राधान्य देणे आणि वेळीच उपचार करणे या उद्देशाने केली आहे. या दृष्टिकोनामुळे केवळ वैद्यकीय परिणामच सुधारत नाहीत, तर कठीण प्रसंगी कुटुंबांना मोठा दिलासाही मिळतो.

डॉ. संजय धर(संचालक, अस्थिरोग विभाग) सांगतात की,* अपघातातील उपचार म्हणजे केवळ तात्काळ उपचार नसून, रुग्ण लवकर पुर्वपदावर यावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. अशावेळी विविध विभागातील तज्ज्ञांना एकाच प्रकरणात एकत्र काम करावे लागते आणि यात उत्तम समन्वय साधणे खूप महत्त्वाची भूमिका बजावते. आपत्कालीन प्रक्रियांपासून ते अतिदक्षता विभाग आणि पुनर्वसनापर्यंत, आम्ही रुग्णांना त्यांच्या पुर्वपादवर येणाच्या प्रवासात आधार देतो.

न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष आणि सीईओ डॉ. माताप्रसाद बी गुप्ता म्हणाले आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांसाठी एक विश्वासार्ह आधार व्यवस्था निर्माण करण्यास आम्ही सज्ज आहोत. याठिकाणी रुग्णांना कोणत्याही गोल्डन अवरमध्ये उपचार मिळतील. हे 'ट्रॉमा केअर सेंटर' रुग्णांना दिलासा,पुरेपुर आराम, सुरक्षितता आणि आजारातून लवकर बरे करण्याची शाश्वती देते.

## सणसर भैरवनाथ यात्रेत सिनेअभिनेत्री खुशी शिंदेचा जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**सणसर/ विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील ग्रामदैवत श्री भैरवनाथ यात्रा उत्सव कमिटीने महिलांसाठी खास मराठी-हिंदी गाण्यांचा डी.जे. शो बुधवार दि.२२ एप्रिल रोजी सायंकाळी आयोजित केला. या कार्यक्रमासाठी सणसर गाव व परिसरातील महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमात सिनेअभिनेत्री खुशी शिंदे हिच्या नृत्य-गायनाने महिलावर्ग व युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. तिच्या रंगतदार अदाकारी व सादरीकरणामुळे प्रेक्षकांनी कार्यक्रमाचा शेवट होईपर्यंत जागा सोडली नाही.संपूर्ण वातावरणात आनंद,उत्साह आणि सांस्कृतिक एकात्मतेची झलक दिसून आली.



या कार्यक्रमासाठी यात्रा कमिटी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये छत्रपती कारखाना संचालक रामचंद्र निंबाळकर, शिवाजीराव निंबाळकर, विक्रमसिंह निंबाळकर, अक्षयभैय्या निंबाळकर, सुमित पाटील,खजिनदार सचिन शिंदे मिथुन बारवकर संग्रामसिंह निंबाळकर,सुशिल निंबाळकर,दिपक निंबाळकर सुधीर निंबाळकर अभयराजे निंबाळकर, शंभूराजे निंबाळकर, विशाल निंबाळकर, हरिभाऊ निंबाळकर,तुषार निंबाळकर सुनील निंबाळकर,तानाजी बाबा निंबाळकर,दत्तात्रय काळे, आबासाहेब निंबाळकर,पिंटू गुप्ते,अजित यादव,विक्रम वाघ,राहुल जगताप,औदुंबर पाटील,पिंटू पाटील,रोहित पाटील,महादेव निंबाळकर, विजय चव्हाण,आदी मान्यवरांचा समावेश होता.सणसर गावातील महिलांसाठी खास सिनेअभिनेत्री खुशी शिंदे हिचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती यावेळी यात्रा कमिटी कडून देण्यात आली.

या उपक्रमामुळे महिलांना सांस्कृतिक आनंदाचा अनुभव मिळाला असून गावात उत्सवाचा जल्लोष अधिक रंगतदार झाला.

## ठाणे पोलीस दलात खुल्या प्रवर्गातून निवड झाल्याबद्दल विलास डोंगरदिवे यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सिद्धार्थ धंदरे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी** : चिखली तालुक्यातील मेरा बु. गावचे सुपुत्र विलास अण्णाभाऊ डोंगरदिवे यांची ठाणे शहर पोलिस दलात खुल्या प्रवर्गातून उल्लेखनीय यश संपादन करत निवड झाली त्याबद्दल त्यांचा नुकताच जिल्हाधिकारी प्रवीणकुमार देवरे यांच्या हस्ते गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी विलास यांच्या अथक परिश्रमांचे आणि चिकाटीचे विशेष कौतुक केले.

विलास डोंगरदिवे यांनी पोलिस भरती प्रक्रियेत 150 पैकी तब्बल 132 गुण मिळवत खुल्या प्रवर्गातून आपली निवड निश्चित केली. ही निवड त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि न डगमगणाऱ्या आत्मविश्वासाचे फलित असल्याचे यावेळी बोलताना अधोरेखित करण्यात आले. अनेक अडचणींवर मात करत, अपयशाला न जुमानता त्यांनी आपले ध्येय गाठले, हे तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

नुकतेच पदभार स्वीकारलेले जिल्हाधिकारी प्रवीणकुमार देवरे यांनी विलास यांच्या यशाबद्दल मनापासून



अभिनंदन करत, "सातत्य, शिस्त आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते," असा संदेश दिला. त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण भागातून येणाऱ्या तरुणांनी अशा यशकथा पाहून प्रेरणा घ्यावी आणि स्वतःचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत.

विलास डोंगरदिवे यांनी सांगितले की, "जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते झालेला हा सत्कार माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि अविस्मरणीय क्षण आहे. माझ्या मेहनतीची दखल घेतल्याने पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा मिळाली आहे." त्यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीयांचे पाठबळ, गुरुजनांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सराव यांना दिले.

यावेळी मा. आमदार अतुल बाबा भोसले यांचे स्वीय सहाय्यक श्री. विनोद सुरडकर तसेच अक्षय अंभोरे यांचीही उपस्थिती होती. त्यांनीही विलास यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विलास डोंगरदिवे यांचा हा यशप्रवास केवळ वैयक्तिक विजय नसून, समाजातील अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कठोर परिश्रम, संयम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतीही अडचण पार करता येते, हे त्यांच्या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.


## अंधश्रद्धेचा काळा खेळ; भोंदू महाराजाकडून महिलेचे लैंगिक शोषण

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे** : निफाड तालुक्यातील धारणगाव (खडक) येथे अंधश्रद्धेचा गैरफायदा घेत एका भोंदू महाराजाने महिलेचे लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात महेशगिरी ऊर्फ महेश दिलीप काकडे (वय अंदाजे ३१, रा. धारणगाव खडक) याच्याविरुद्ध बलात्कारासह महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला (वय २८, रा. उत्तम नगर, नाशिक) हिने दिलेल्या फिर्यादीनुसार, वैवाहिक आयुष्यातील अपयश आणि मानसिक ताणतणावामुळे ती अस्वस्थ होती. याच अवस्थेचा फायदा घेत तिच्या आई-वडिलांनी तिला धारणगाव येथील एका तथाकथित मठात नेले. तेथे आरोपी स्वतःमध्ये दैवी शक्ती असल्याचा दावा करत 'करणीबाधा' काढण्याचे नाटक करीत होता.

दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी मठात गेल्यानंतर आरोपीने महिलेच्या अंगात



करणीबाधा असल्याचे सांगत विविध विधी करण्यास भाग पाडले. त्यानंतर मोबाईल क्रमांक घेत वारंवार अश्लील व वैयक्तिक संदेश पाठवण्यास सुरुवात केली. पुढे दि. २३ ऑगस्ट रोजी पंचवटी परिसरात भेटीस बोलावून आरोपीने तिला त्र्यंबकेश्वर रोडवरील एका लॉजवर नेले. तेथे 'माझ्याकडे दैवी शक्ती आहे' अशी भीती दाखवत तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच तिचे विवस्त्र फोटो काढून धमकावल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

घटनेनंतर पीडित महिला मानसिक धक्क्यात होती. आरोपीचा प्रभाव आणि कुटुंबीयांची भीती यामुळे तिने तक्रार देण्यास टाळाटाळ केली. दरम्यान, आरोपीने तिच्या मोबाईलमधील पुरावेही डिलीट केल्याचे समोर आले आहे. नंतर पीडितेचे लग्न झाले, मात्र आरोपीच्या प्रभावशाली ओळखीमुळे ती गप्प राहिली.अखेर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांनी धीर दिल्यानंतर पीडित महिला व तिच्या पतीने लासलगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पाटील यांनी तपास करून गुन्हा नोंदवला आहे.

दरम्यान, आरोपीने अशाच प्रकारे इतर महिलांनाही जाळ्यात ओढले असण्याची शक्यता व्यक्त होत असून, आणखी पीडित महिलांनी पुढे येऊन तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## साखरे बोरगांव येथे राजेसाहेब दर्गा उरूस निमित्त भव्य कुस्ती स्पर्धा संपन्न

### बालाघाट हिंद केसरीचा मानकरी आकाश करे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथे अक्षय तृतीया निमित्त राजेसाहेब दर्गा उरुस यात्रे निमित्त बालाघाट हिंद केसरी जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वर्षी बालाघाट हिंद केसरीचा बहुमान आहेर चिंचोली येथील पैलवान आकाश करे यांनी पटकवला आहे. स्वर्गीय रावसाहेब टेकाडे यांच्या स्मरणार्थ ११११११/- रुपयाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस व बालाघाट हिंद केसरी चे सन्मानचिन्ह देवून पैलवान आकाश करे यांचा सन्मान करण्यात आला. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेत राजेसाहेब दर्गा उरुस भव्य संदल मिरवणुक काढण्यात आली. कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीचा खेळ आज ही साखरे बोरगांव येथे ही कुस्ती परंपरा कायम ठेवली



आहे. या स्पर्धेत कै.हरिश्चंद्र घोडके यांच्या स्मरणार्थ ५५५५ /-रुपयाचे बक्षिस, कै.रामकृष्ण घरत यांच्या स्मरणार्थ ३३३३/- रुपयाचे बक्षीस, कै.शांताबाई घरत यांच्या स्मरणार्थ २२२२/- रुपायाचे बक्षीस, कै.सोमनाथ देवगुडे यांच्या स्मरणार्थ ११११/- रुपयाचे बक्षीस, माजी सरपंच कै.गंगाधर जगदाळे यांच्या स्मरणार्थ ११११/- रुपयाचे बक्षीस, कै.बाबासाहेब घरत यांच्या स्मरणार्थ ११११/- रुपये बक्षीस व कै.प्रभाकर झनझन यांच्या स्मरणार्थ ११११/- रुपयाचे रोख बक्षीस ठेवण्यात आले होते. प्रारंभी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन नामवंत पहेलवान श्री.बाळासाहेब आवारे(आबा) व पैलवान शंकर अप्पा चव्हाण यांच्या शुभ हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. या कुस्ती स्पर्धेत महिला कुस्तीपटुने सहभाग नोंदवला. वाशी येथील दोन विद्यार्थीने योगाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके दाखवली.

बालाघाट केसरीचा बहुमान मुबंई महानगर पालिकेचे नगररचना अभियंता विजय टेकाडे, मच्छिंद्र घरत, माजी सरपंच नामदेवराव देवगुडे, सरपंच गजानन घरत, चेअरमन राजेंद्र नाना घरत, माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे, गुत्तेदार राजेंद्र घोडके, सह आदि मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रदान करण्यात आला. या कुस्ती स्पर्धेत पंच म्हणुन अशोक गाढवे, विश्वाबंर जगदाळे, रमेश देवगुडे आदिनी काम पाहिले. तर या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीचे सदस्य ईंजि.शिवाजी घरत, बालासाहेब घोडके, ह.भ.प.वसंत जगदाळे, सुरेश घोडके, प्रा.डॉ.अशोक देवगुडे, दत्ता जगदाळे, अजिंक्य जगदाळे, अविनाश जगदाळे, संभाजी जोगदंड , बापू जाधव सह आदि तरूण मंडळीने अथक परिश्रम घेतले.

या कुस्ती स्पर्धेचे बहारदार संचलन व समालोचन रामहारी घोडके यांनी केले तर आभार राजेंद्र नाना घरत यांनी मानले.

# सलग तिसऱ्या दिवशी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरूच

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : तालुक्यातील वांगण सुळे व खोबळा या गावांतील जलसंधारणाची कामे तातडीने सुरू करण्यात यावी या मागणीसाठी सुरू असलेले ग्रामस्थांचे बेमुदत आंदोलन आज सलग तिसऱ्या दिवशीही सुरू असून मागण्या मान्य न केल्यास आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. तहसील कार्यालय, सुरगाणा येथे आंदोलनकर्त्यांनी ठिय्या मांडत आपली भूमिका कायम ठेवली आहे. आंदोलनात महिला, पुरुष व युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून दिवसेंदिवस पाठिंबा वाढताना दिसत आहे.

वांगण सुळे व खोबळा येथील जलसंधारण व बंधाऱ्यांची कामांमुळे परिसरातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार होती; मात्र कामे ठप्प असल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.




संबंधित लोकप्रतिनिधींकडून कोणतीही ठोस दखल घेतली गेलेली नाही, असा आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी आंदोलन अधिक उग्र करण्याचा इशारा दिला असून, येत्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात जनसमर्थन मिळवत आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया, विदर्भ शाखेचा पदग्रहण समारंभ २६ एप्रिल रोजी संपन्न होणार

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया, विदर्भ शाखा, आपला २०२६-२७ या वर्षाचा पदग्रहण समारंभ रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता, हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर येथे आयोजित करणार आहे.

या प्रसंगी, डॉ. निधीश मिश्रा यांची अध्यक्षपदी आणि डॉ. विवेक मंदुरके यांची सचिवपदी, तसेच त्यांच्यासोबत नवीन कार्यकाळासाठीच्या पदाधिकारी संघाची अधिकृतपणे निवड व पदस्थापना केली जाईल.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे नौदल



प्रमुख (Chief of the Naval Staff), ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांची गौरवशाली उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी म्हणून पीजीआयएमईआर (PGIMER), चंदीगड येथील सीटीव्हीएस (CTVS) विभागाचे प्रमुख डॉ. श्याम कुमार सिंग थिंगनाम उपस्थित राहतील.

या कार्यक्रमात विविध शैक्षणिक सत्रांची मालिका आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील काही रंजक 'क्लिनिकल केसेस'वरील चर्चा, IVUS-मार्गदर्शित उपचार पद्धतींमधील प्रगतीवर आधारित विशेष अतिथी व्याख्यान आणि प्रतिष्ठित 'डॉ. के. जी. देशपांडे स्मृती व्याख्यान' यांचा समावेश असेल. डॉ. निधीश मिश्रा यांचे " (हृदयविकाराच्या झटक्यापलीकडे: १०० प्राथमिक ॲंजियोप्लास्टी; प्रक्रियेतील अनुभव आणि निष्कर्ष) या शीर्षकाचे अध्यक्षीय व्याख्यान हे या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण असेल.

याव्यतिरिक्त, प्रतिबंधात्मक हृदयरोगशास्त्र (Preventive Cardiology) आणि हृदयाच्या आरोग्याबाबत सामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने, त्याच दिवशी दुपारच्या सत्रात (आहार, व्यायाम आणि हृदय: निरोगी जीवनासाठी साधे बदल) या विषयावर एक 'सार्वजनिक चर्चासत्र' आयोजित केले जाईल.

हा कार्यक्रम हृदय व रक्तवाहिन्यांच्या आरोग्याच्या क्षेत्रात शैक्षणिक उत्कृष्टता, नवनिर्मिती आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याच्या दिशेने असलेल्या या संस्थेच्या अविरत कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

या कार्यक्रमाचे वार्तांकन करण्यासाठी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना आग्रहाचे निमंत्रण देण्यात येत आहे.

कार्यक्रमाचा तपशील (एका दृष्टिक्षेपात):

कार्यक्रम: पदग्रहण समारंभ – कॉरडियालॉजीकल सोसायटी विदर्भ शाखा

दिनांक: रविवार, २६ एप्रिल २०२६

वेळ: सकाळी ९:०० वाजल्यापासून ४:०० पर्यंत

स्थळ: हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर

# जात - निरंक प्रमाणपत्र दाखवा व १ लाखाचे बक्षीस मिळवा

## जनगणनेत "धर्म बौद्ध, जात महार" लिहिण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे तालुका प्रतिनिधी** : आगामी जनगणनेच्या पार्श्वभूमीवर बौद्ध समाजात जात व धर्म नोंदणीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आवाहन करण्यात आले आहे. डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या अधिकारांच्या आधारे अनुसूचित जातींना मिळणाऱ्या सवलतींचा लाभ कायम ठेवण्यासाठी जनगणनेत "धर्म – बौद्ध" व "जात – महार" अशी अचूक नोंद करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

माहितीनुसार, २४ सप्टेंबर १९९० च्या शासन निर्णयानुसार महार समाजातील लोकांनी धर्मांतर करून बौद्ध धर्म स्वीकारला असला तरी जात प्रमाणपत्रात अनुसूचित जातीचा क्रमांक (३७) कायम ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. या निर्णयाची अंमलबजावणी १९९१ पासून सुरू झाली असून आजही त्याच पद्धतीने प्रमाणपत्रे दिली जात आहेत.तज्ज्ञांच्या मते, भारतीय



राज्यघटनेतील आर्टिकल ३४१ अंतर्गत अनुसूचित जातींना आरक्षण व इतर शासकीय सुविधा देण्याची तरतूद आहे. त्यामुळे जात नोंद न केल्यास भविष्यातील पिढ्यांना या सवलतींपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. दरम्यान, काही ठिकाणी "धर्म बौद्ध व जात निरंक (रिकामी)" अशा प्रकारचे प्रमाणपत्र अस्तित्वात असल्याचा दावा केला जात असल्याने यावर शंका उपस्थित करण्यात आली आहे. असे कोणतेही अधिकृत प्रमाणपत्र दाखवणाऱ्या व्यक्तीस १ लाखांचे बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच खोटे किंवा बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

यासोबतच, केंद्र व राज्य स्तरावरील प्रमाणपत्रांमध्ये फरक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. राज्य स्तरावरील प्रमाणपत्र काही प्रकरणांमध्ये केंद्र शासनाच्या नोकऱ्यांसाठी ग्राह्य धरले जात नसल्याने उमेदवारांना स्वतंत्र केंद्रीय प्रमाणपत्र काढावे लागते.

समाजातील सुजाण नागरिकांनी चुकीच्या माहितीपासून दूर राहून, जनगणनेत योग्य माहिती नोंदवावी, तसेच पुढील पिढ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सजग राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते ग्यानचंद जांभूळकर व सेवानिवृत्त नायब तहसीलदार राजेश मडामे व संतोष ऊकणकर यांनी संयुक्तपणे नागरिकांना मार्गदर्शन केले असून, संभ्रम निर्माण करणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# डिजिटल युगात वाचन संस्कृती जपणे काळाची गरज

## इंद्रराज आणि विवेकानंद महाविद्यालयाच्या संयुक्त वेबिनारमध्ये तज्ज्ञांचा सूर

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड आणि विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय ज्ञान परंपरा आणि वाचन संस्कृती' या विषयावर आयोजित वेबिनार उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव अशोकजी देवरे यांच्या हस्ते झाले. देवरे यांनी भारतीय ज्ञान परंपरेचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करताना वेद, उपनिषदे व प्राचीन ग्रंथांच्या माध्यमातून ज्ञानाचे संवर्धन कसे झाले, यावर प्रकाश टाकला. "आजच्या डिजिटल युगात वाचन संस्कृती जपणे ही काळाची गरज असून 'वाचाल तर वाचाल'," असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन त्यांनी केले.




तांत्रिक सत्रात विवेकानंद महाविद्यालयाचे इतिहास विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. अरुण वाहूळ यांनी 'वाचन संस्कृती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "भारतीय समाजात वाचन संस्कृतीला विशेष महत्त्व असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन हे वाचन आणि ज्ञानप्राप्तीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या वैयक्तिक ग्रंथसंग्रहामुळे त्यांना 'ग्रंथप्रेमी' म्हणून ओळखले जाते." दिल्ली विद्यापीठातील डॉ. भीमराव आंबेडकर विद्यालयाचे डॉ. अनिल कांबळे यांनीही या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथील महर्षी कर्वे ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. सुभाष चव्हाण म्हणाले, "डिजिटल साधने उपलब्ध असली तरी पारंपरिक वाचनाची सवय जपून ठेवणे आजही तितकेच गरजेचे आहे." अध्यक्षीय समारोपप्रसंगी इंद्रराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुदत्त राजपूत यांनी, "वाचन हीच यशाची गुरुकिल्ली आहे," असे सांगितले.

वेबिनारचे सूत्रसंचालन डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी केले, तर प्रास्ताविक डॉ. सविता म्हस्के यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. गोवर्धन औटे व आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष चौथाईवाले यांनी आभार मानले. कार्यक्रमास विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादाराव शिंदे, इंद्रराज महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. जालिंदर अंभोरे आणि सत्र अध्यक्ष म्हणून विवेकानंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवींद्र शिंदे उपस्थित होते. वेबिनारमध्ये दोन्ही महाविद्यालयांचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विविध राज्यातील अभ्यासक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पुस्तके हा माणसाच्या बुद्धीचा सहजसुंदर आविष्कार: विष्णू मोरे

## ज्ञानविकास विद्यालयात जागतिक पुस्तक दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**भराडी (ता. सिल्लोड)** : पुस्तके माणसाला घडवतात आणि त्यावर संस्कार करतात. पुस्तकाचे बाह्यअंग जितके महत्त्वाचे तितकाच त्याचा मजकूर जीवनदायी आणि उपयुक्त असतो. पुस्तकांना आपले मित्र माना आणि उन्हाळी सुटी या पुस्तक-मित्रांच्या संगतीत घालवा," असे प्रतिपादन विष्णू विठ्ठल मोरे यांनी केले.

भराडी येथील ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुस्तक दिनाच्या शुभेच्छा देऊन वाचन संस्कृतीचे महत्त्व




सांगितले. "स्मार्टफोनच्या युगात विद्यार्थ्यांची लेखनाची व वाचनाची सवय कमी होत आहे, ही चिंतेची बाब आहे. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीनुसार यशस्वी व्हायचे असल्यास विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीवर विशेष भर दिला पाहिजे," असे मत मोरे यांनी मांडले.

यावेळी शिक्षिका ज्योती मोहिते म्हणाल्या, "कुंभार जसा मातीच्या गोळ्याला आकार देऊन मूर्ती तयार करतो, तसेच पुस्तके आपल्या आयुष्याला आकार देतात. विचार करण्याचे अंतर्मन व जग पाहण्याची वेगळी दृष्टी पुस्तके प्रदान करतात."

कार्यक्रमास विष्णू मोरे, ज्योती मोहिते यांच्यासह ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# सेलूत 'सन्मान कर्तृत्वाचा' सोहळा; २५ एप्रिल रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**सेलू (प्रतिनिधी)शिवाजी पवार** : स्व. अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्था, सेलू यांच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त 'सन्मान कर्तृत्वाचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री साई नाट्यगृह, सेलू (जि. परभणी) येथे होणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राजयोगिनी ब्रह्माकुमारी करुणा दीदी (संचालिका, सेलू केंद्र) उपस्थित राहणार असून, अध्यक्षस्थानी ह.भ.प. नामदेव महाराज हळवे राहणार आहेत. याशिवाय भावना मुंगसे-बोर्डीकर, आर. बी. घोडके, विजयमाला




डोंबे, डॉ. संजय रोडगे, मिलिंद सावंत यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या वेळी विशेष सन्मान म्हणून सौ. मीनाताई रामप्रसादजी बोर्डीकर यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच अध्यात्म, शेती, वैद्यकीय, पत्रकारिता, साहित्य, शिक्षण, क्रीडा व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित केले जाणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष अशोक काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, या सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी दिली युवा मोर्चाचे पनवेल शहर सरचिटणीस अनिमेष ओझे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचा प्रदेश दौरा सुरू आहे. त्यांच्या उपस्थितीत काल आणि आज उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चाच्या वतीने अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले. आज सकाळी त्यांनी युवा मोर्चाचे पनवेल शहर सरचिटणीस अनिमेष ओझे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.त्यावेळी



जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, विश्वजीत पाटील, भाजपा पनवेल अध्यक्ष सुमित झुंजारराव, सरचिटणीस अमित ओझे,रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, प्रीतम म्हात्रे, प्रशांत शेटे, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा, नगरसेविका शिवानी घरत, अस्मिता घरत यांच्या सह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जेएनपीए मध्ये 'अग्निशमन सेवा सप्ताह' उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या शूर अग्निशमन दलातील जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि जनसामान्यांत अग्नी सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत 'अग्निशमन सेवा सप्ताह' मोठ्या उत्साहात पार पडला.




१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईच्या डॉक यार्ड येथे 'एस.एस. फोर्ट स्टिकिन' या स्फोटकांनी भरलेल्या ब्रिटीश जहाजाला भीषण आग लागली होती. या आगीवर नियंत्रण मिळवताना अग्निशमन दलाच्या ६६ हून अधिक जवानांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या त्यागाची आठवण म्हणून दरवर्षी १४ एप्रिल हा 'शहीद दिन' म्हणून पाळला जातो.

सप्ताहाच्या सुरुवातीला जेएनपीटीएचे मा.अध्यक्ष श्री. गौरव दयाळ यांना अग्निशमन दलाच्या जवानांनी शिस्तबद्ध मानवंदना व सलामी दिली. त्यानंतर अध्यक्ष महोदयांच्या हस्ते 'पिन फ्लॅग' लावून आणि देणगी पेटीचे उद्घाटन करून सप्ताहाचा अधिकृत प्रारंभ करण्यात आला.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी जेएनपीएचे उपाध्यक्ष श्री. रविश कुमार, विश्वस्त श्री. रवींद्र पाटील, महाव्यवस्थापक (प्रशासन) श्रीमती मनीषा जाधव, एस ई झेड चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नितीन बोरवणकर आणि उपसंरक्षक श्री. बी. व्ही. पवार यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सप्ताहभरात एसीझेड (SEZ) अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी परिसरातील विविध कारखान्यांमध्ये जाऊन आग प्रतिबंधक सुरक्षा उपायांवर व्याख्याने दिली केवळ मार्गदर्शनात नव्हे तर प्रत्यक्ष आग लागल्यास ती कशी भिजवावी याचे जिवंत प्रात्यक्षिक विविध उद्योगांमध्ये दाखवण्यात आले जीवित आणि मालमत्तेचे हानी कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय किती महत्त्वाचे आहेत यावर यावेळी भर देण्यात आला २०एप्रिल रोजी या सप्ताहाची सांगता झाली आणि या उपक्रमामुळे औद्योगिक वसाहतीतील कामगार आणि सर्वसामान्यांमध्ये सुरक्षा बाबत मोठी जागरूकता निर्माण झाली आहे.

# चिकना तलाव अतिक्रमण प्रकरणी उपोषण स्थगित

## प्रशासनाच्या ९० दिवसांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार** : तालुक्यातील मौजे चिकना येथील मालगुजारी तलावांवरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण अखेर प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर स्थगित करण्यात आले. उपोषणकर्ते शंकर मोहनराव आवरे (रा. चिकना, ता. धर्माबाद) यांनी प्रशासनाने दिलेल्या ठोस आश्वासनावर समाधान व्यक्त करत आंदोलन मागे घेतले.




चिकना गावातील सात मालगुजारी तलावांवर वाढत्या अतिक्रमणाच्या विरोधात शंकर आवरे यांनी दि. २० एप्रिल २०२६ पासून आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनामुळे गावासह संपूर्ण तालुक्यात या प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले होते. तलावांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याची गंभीर बाब त्यांनी प्रशासनासमोर मांडली होती.

दि. २२ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, धर्माबाद तसेच संबंधित विभागातील कनिष्ठ अभियंत्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.

चर्चेदरम्यान प्रशासनाने पुढील ९० दिवसांच्या आत तलावांची मोजणी करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देत पुढील कार्यवाही सुरू करण्याचे ठोस आश्वासन दिले. या सकारात्मक भूमिकेनंतर शंकर आवरे व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत उपोषण मागे घेतल्याची अधिकृत घोषणा केली.चिकना येथील तलाव अतिक्रमणाचा प्रश्न हा केवळ स्थानिक नसून पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणात वेळेत आणि प्रभावी कारवाई करणे गरजेचे असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. आता प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

इशारा कायम; मुदतीत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

उपोषण स्थगित करण्यात आले असले तरी आंदोलनकर्त्यांनी आपला इशारा कायम ठेवला आहे. प्रशासनाने दिलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत तलाव मोजणी व अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया सुरू न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनावर आश्वासनांची पूर्तता करण्याचे मोठे दडपण निर्माण झाले आहे.

# सायबर जागरूकतेसह हळदी-कुंकू समारंभ: कमळ महिला पतसंस्था: परंपरा आणि जागरूकतेचा सुंदर संगम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्था (म.) पनवेल ही संस्था महिलांसाठी नेहमीच विविध उपक्रम राबवित असते. यावर्षीही चैत्रगौरी निमित्त हळदी-कुंकू समारंभ मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम पतसंस्थेच्या कर्मचारी प्रशिक्षण केंद्र, पहिला मजला, जयभारत नाका, पनवेल येथे पार पडला.




समारंभाच्या सुरुवातीला संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. पूर्वा खेडेकर यांनी उपस्थित महिला सभासदांचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून दक्षता समिती सदस्य तथा सहाय्यक पोलिस निरीक्षक सौ. सारिका मॅडम आणि सहाय्यक पोलीस श्री. सचिन पोवार सर उपस्थित होते. संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. पूर्वा खेडेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून संस्थेच्या आर्थिक स्थितीची सविस्तर माहिती दिली. व विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच चैत्रगौरी हळदी-कुंकू समारंभाची महती याबाबत महिलांना मार्गदर्शन केले व महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे सो सारिका मॅडम व श्री सचिन पोवार सर यांनी उपस्थित महिलां संभासदाना सायबर गुन्हे आणि सध्याच्या परिस्थितीबाबत मार्गदर्शन केले. आणि त्यांनी केलेले मार्गदर्शन सर्व महिलांना खरोखरच मोलाचे ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थित महिलांना झाला. कार्यक्रमात महिलांसाठी मनोरंजनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाः त्यानंतर सर्व उपस्थित महिला सभासदांना हळदी-कुंकू वाण दिले. यावेळी चांगल्या प्रकारे महिला सभासदांनी उपस्थिती दर्शवली. या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मालती आंग्रे, उपाध्यक्षा सौ. पूर्वा खेडेकर, संचालिका श्रीमती चित्रा मानकामे, सौ. मनीषा विसपुते, सौ. सुषमा जांभळे, सौ. निर्मला म्हात्रे, सौ. अर्चना गायकवाड तसेच संस्थेच्या महिला कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. संस्थेचे संस्थापक तथा तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर यांच्या मार्गदर्शनामुळे हा हळदी-कुंकू समारंभ यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रम आनंददायी आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला.

# "श्री सिद्धनाथ जोगेश्वरी मंदिरासमोर बाबुराव सोपानराव पाटील परिवारातर्फे धार्मिक कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर** : माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी कै. सोपानराव बाळासाहेब पाटील यांनी खरसुंडी येथील देवस्थान "श्री सिद्धनाथ जोगेश्वरी"यांचे मंदिर बांधले असून सदर मंदिरासमोर दरवर्षी बाबुराव सोपानराव पाटील व परिवारातर्फे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्याप्रमाणेच चालू वर्षी सुद्धा सालाबाद प्रमाणे "श्री सिद्धनाथ जोगेश्वरी मंदिरासमोर"गजी ढोल व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिराचे पुजारी प्रकाश चौगुले यांनी श्री व सौ बाबुराव पाटील



व श्री व सौ करण पाटील यांच्या हस्ते धार्मिक विधी केले. याचवेळी गजी ढोलचा धार्मिक व पारंपारिक कार्यक्रम करण्यात आला. मनीषा नवनाथ साळुंखे यांनी "श्री सिद्धनाथ जोगेश्वरी मातेला"पोशाख अर्पण केला यावेळी पाटील परिवारातर्फे महाप्रसादाचे हे वाटप करण्यात आले या महाप्रसादामध्ये देविदास मदने यांनी बुंदीचे लाडू तर रणधीर काटे यांनी जिलेबीच्या प्रसादाचे सहकार्य केले.

यावेळी नारायण मदने, बबन पाटील, अर्जुन लेंगरे, वसंत लेंगरे त्याचप्रमाणे जयसिंह राजेंद्रसिंह जहागिरदार हेही आवर्जून उपस्थित होते.सदर कार्यक्रमाला पंचक्रोशी अनेक स्त्री-पुरुष भाविकभक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित राहून लाभ घेत असल्याचे दिसून आले.

# महाराणा टायपिंगच्या उज्वल यशाची परंपरा कायम; उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रशांत भाऊंनी केला हृदय सत्कार

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर :प्रतिनिधी /सय्यद ईसा** : माहूर शहरातील टायपिंग इन्स्टिट्यूट मध्ये अनेक वर्षापासून आग्रगन्य असलेली संस्था महाराणा टाईप रायटिंगच्या विद्यार्थ्यांनी सलग उज्वल यश संपादन केल्याने मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांनी याची दखल घेऊन इन्स्टिट्यूट मध्ये जाऊन सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक संचालकांचा हृदय सत्कार केला यावेळी मान्यवर उपस्थित होतेमहाराणा टाईप रायटिंग इन्स्टिट्यूट या संस्थेने अनेक वर्षापूर्वी सर्वप्रथम माहूरमध्ये इन्स्टिट्यूटची स्थापना करून



अनेक विद्यार्थी घडवून त्यांना शासकीय नोकरीसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी घडवले आहेत तसेच अनेक सार्वजनिक उपक्रमात संस्थेने मोलाची कामगिरी बजावली आहे संस्थेचे संचालक नयनसिंह राठोड श्रीमती मेघा मनवर हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवण्यासाठी सतत कार्यरत असतात मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड हे शिक्षण घेऊन भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ते सतत कार्यरत असतात त्यामुळे त्यांनी महाराणा टायपिंग इन्स्टिट्यूट च्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केल्याची माहिती मिळतात त्यांनी इन्स्टिट्यूट मध्ये येऊन सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार केला यावेळी पत्रकार विजय आमले दत्तात्रय शेरेकर एस एस पाटील लिंबायतचे उपसरपंच सुनील चुगडे श्री दत्तकृपा प्रतिष्ठानचे संचालक विजय कांबळे बंडू राठोड प्रदीप पवार दीनेश पवार रवि वायकूळे करण गेडाम शेख सलिम कादर भाई बावाणी गजानन शद्दलवार दिगंबर जोशी राजू पवार नवल वानखेडे भारत राठोड यांचे सह मान्यवर उपस्थित होते यावेळी उल्लेखनीय यश संपादन केलेले विद्यार्थी नेहा राठोड - 88.5 चैतन राठोड - 88.5 नैना मुंडे - 87आदीय कचवारे - 86 चैतन दुधे - 85.5रोहन भहीरे बेहेरे - 82-5 नैतीक कांबळे - 80श्लोक शदत्यवार - 79 प्रथम दुधे - 47राधिका प्रिरिहार - 76.5आदित्य पाँडे 75-5संशम कोकाटे - 75 ओम राठोड 65संकेद दूधे -65 कपील राठोड - 74 वरील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केल्याने त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त विशेष उपक्रम ; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

'माझी वसुंधरा अभियान ' अंतर्गत जागतिक वसुंधरा दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेमार्फत रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे पर्यावरणविषयक विशेष उपक्रमाचे आयोजन दिनांक 23 एप्रिल रोजी करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. महापालिका आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमामध्ये पर्यावरण विषयावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात निबंध लेखन, पोस्टर निर्मिती, प्रश्नमंजुषा स्पर्धेचा समावेश होता. तसेच यावेळी महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. याचबरोबर पर्यावरणविषयक शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित उपक्रमांविषयी जनजागृती निर्माण करणे हा होता. याच अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव दृढ करण्यासाठी वृक्षारोपणासारखे उपक्रमही यावेळी राबविण्यात आले. याच पध्दतीने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी सांगितले आहे.या कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या निशा नायर, शिक्षिका नमिता अखौरी, महापालिकेचे अधिकारी, शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## कविता



### मित्र

मैत्री केली तर,
जात पाहू नका,
आणि मदत केली तर
ती बोलून दाखवू नका.
कारण कोणत्याही
बाटलीचा सील,
आणि दोस्तांचा दिल
एकदा तोडला की
विषय संपला.
मित्र गरज म्हणून नाही
तर सवय म्हणून जोडा,
कारण गरज संपते पण
सवय कधीच सुटत नाहीत.
"मित्र" नावाची ही दैवी देणगी
जीवापाड जपून ठेवा,
कारण..जीवनांतील
अर्धा गोडवा हा
मित्रांमुळेच असतो.
कोणीतरी विचारले
मित्रांमध्ये एवढे काय विशेष
नातेवाईकां पेक्षा.
त्यांना सांगितले,
मित्र हे फक्त मित्र असतात.
त्यात सख्खे,चुलत,मावस,सावत्र
असं काही नसते.
ते "थेट" मित्रच असतात.
"मैत्रीचे धागे हे
कोळ्याच्या जाळ्या पेक्षाही
बारीक असतात.
पण लोखंडाच्या तारेहुनही
मजबूत असतात.
तुटले तर श्वासानेही तुटतील,
नाहीतर वज्राघातानेही
तुटणारच नाहीत.
प्रत्येक दुखण्यावर
दवाखान्यात उपचार
होतातच असे नाही.
काही दुखणी
कुटुंब आणि मित्र मंडळी
यांच्या बरोबर हसण्या आणि
खिदळण्यानेही बरी होतात.
माणसाने
कितीही प्रयत्न केले तरी
अंधारात "सावली"
म्हातारपणात "शरीर"
आणि..
आयुष्याच्या
शेवटच्या काळात "पैसा"
कधीच साथ देत नाहीत,
साथ देतात ती
फक्त आपण जोडलेले
"जवळचे मित्र.
मित्र बोलवित आहे,
पण तुम्हाला जावेसे
वाटत नसेल तर..
समजा की तुम्ही म्हातारे झालात.
म्हातारपण येवू न देणे
आपल्या हातातच आहे ना.
मित्रांसोबत रहा व आनंदात
जीवन भर जगत रहा.
सर्व जिवलग मित्रांसाठी

**कवी अज्ञात**
**सोशल मिडियावरचे**
**संकलन :- सागर रामभाऊ तायडे,**

# नागपूर : परिमंडळ क्र . ४ मध्ये मध्यरात्री कॉम्बिंग ऑपरेशन ; अवैध दारूविरोधी मोहिमेत २० कारवाया

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ४ यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात व्यापक स्वरूपाचे कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. २१ एप्रिल रोजी रात्री ११.०० ते २२ एप्रिल पहाटे ०२.०० वाजेपर्यंत ही मोहीम चालली. परिमंडळातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाचवेळी ही कारवाई करण्यात आली.

सहायक पोलीस आयुक्त, अजनी विभाग यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मोहिमेत ३० अधिकारी, १०० अंमलदार आणि



१ आरसीपी प्लाटून सहभागी झाले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासोबतच गुन्हे प्रतिबंधासाठी विविध ठिकाणी तपासणी व कारवाया करण्यात आल्या.

अवैध दारूविरोधी मोहिमेवर विशेष भर देत हॉटेल, लॉज, ढाबे तसेच संशयित ठिकाणांची सखोल तपासणी करण्यात आली. दारूबंदी कायद्यांतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात आली. तसेच तडीपार, एमपीडीए आणि इतर गंभीर गुन्ह्यांतील संशयित आरोपींच्या घरांचीही तपासणी करण्यात आली.

**कारवाईचा तपशील :**

दारूबंदी प्रकरणे : २०

एनडीपीएस प्रकरणे : ०२

तडीपार/रेकॉर्डवरील आरोपी तपासणी : ७२ व्यक्ती

सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन : ६४ कारवाया

प्रतिबंधात्मक कारवाई (कोपटा) : २१

वेळेपेक्षा जास्त सुरू असलेली आस्थापने : १२

या कारवाईमुळे परिसरात सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली असून नागरिकांकडून पोलीस कार्यवाहीला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. पुढील काळातही अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असून नागरिकांनी कायद्याचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# चल चिऊताई, परत चल

फार गहिवरून आलं गं चिऊताई. चहूबाजूंनी तुला हरलेलं पाहताना आणि घरासोबत तुझं मनही वितळताना बघून मनात खोल हळहळ दाटून आली. माणसांच्या विश्वाने भुरळ घातलेल्या तुझ्या मनाने, माणसांचं अनुकरण केलं. माणसासारखं जगण्याच्या तुझ्या अट्टहासाने तुला आज माणसांसारखंच शून्यात उभं केलं आहे.

चिऊताई, दिवस सरून गेले, ऋतू बदलले; पण त्या भूतकाळातील आठवणी अजूनही पुसल्या नाहीत. त्या काळजात आजही खोलवर रुजलेल्या आहेत. आजही आठवतो तो पावसाळा... ती कडकडणारी थंडी... आणि त्या थंडीत तुझ्या दारावर मदतीसाठी याचना करणारा हा तुझा भाऊ.

शेवटी मला आपल्या जमातीनेच वाचवलं. या माणसांच्या गर्दीत पडून राहिलो असतो, तर कदाचित पायाखाली तुडवलाही गेलो असतो. पण आपल्या जमातीच्या मायेनेच आज मी तुझ्यासमोर जिवंत उभा आहे.

पण किती वेडी झाली होतीस गं तू! या भौतिक विश्वाच्या मोहात. चक्क माणूस बनली होतीस. ना तुला ऐकू येत होती रक्ताची हाक, ना या असहाय्य भावाची दारावरची आर्त थाप.

पण चिऊताई, मी हे सर्व विसरून गेलो आहे. त्या दिवसाच्या पावसासोबत माझ्या मनातील सारं दुःख वाहून गेलं आहे. आणि हो, मनात राग साठवून ठेवायला मी कुठे माणूस थोडीच आहे! म्हणून माझ्या मदतीचा हात आणि माझ्या घरट्याचं दार आजही तुझ्यासाठी उघडंच आहे.हे तुझं मेणाचं घर एक दिवस वितळणार होतंच, कारण हे भौतिक विश्व क्षणभंगुर असतं.तरीही मी तुला वारंवार सांगत होतोच. पण माणसांचं हे बिलोरी साम्राज्य पाहून तू हुरळून गेलीस. त्या गर्दीत इतकी रममाण झालीस की चक्क माणसांसारखीच दिशाहीन, निष्ठुर बनून या भौतिक विश्वात गुंतून गेलीस. एवढी गुंतलीस की आपल्या रक्ताचा रंगही विसरलीस.

आपलं विश्व विसरून एका अनामिक उंचीपर्यंत उडालीस. वास्तविकतेला विसरून हव्यासात किती ओथंबून गेलीस.

माणसांसारखं जगण्यासाठी तू एक सुंदर विश्व मागे सोडलंस; पण त्यांच्या स्वार्थाच्या जगात तू चिरडली गेलीस. ज्या घराच्या मोहासाठी तू आपल्या विश्वाला लाथाडलंस, तेच घर उन्हाच्या एका झळीत वितळून मातीशी लोळायला लागलं.

आज तुझ्या हातात उरलं तरी काय? काही अश्रू... आणि काही तुटलेल्या आठवणी.

माणसांचं हे विश्व असंच असतं. भौतिक गोष्टींच्या हव्यासापायी माणूस हातची नाती, हक्काची माणसं आणि अनमोल जगणं मागे टाकत पुढे जातो. आणि जेव्हा या बेभान प्रवासात त्याला कोणाच्या सोबतीची खरी जाणीव होते, तेव्हा त्याला जगण्याचा खरा अर्थ उमजतो.

पण तेव्हा मात्र खूप उशीर झालेला असतो. हातचं सगळं निसटून गेलेलं असतं. मातीमोल झालेलं असतं.

आज तरी तुला हे उमजलं की नाही, चिऊताई?

पण तुझ्यासोबत मी असं होऊ देणार नाही. तुझ्यावर हसायला मी माणसांची जात थोडीच आहे.

चल चिऊताई... या स्वार्थी माणसांच्या जगातून बाहेर पड. माणूस माणसाचा गळा घोटणाऱ्या या रक्तरंजित प्रवाहातून दूर आपल्या घरट्याकडे परत चल.माणसाच्या हव्यासाने आग ओकणाऱ्या सूर्यामुळे आज तुझं घर वितळून मातीमोल झालं आहे. उद्या एखाद्या अण्वस्त्राच्या ठिणगीने सगळं जग जळून खाक होण्याआधी आपल्या विश्वात परत चल.

आपली जमात आजही तुला स्वीकारण्यासाठी आतुर आहे.

**लेखिका : सौ आरती नागपुरे**
**अमरावती**

# दिव्यांगांच्या हक्कांवर घाला? नोटीस वसुलीला शिवसेनेचा कडाडून विरोध

## कारवाई थांबवा अन्यथा भव्य मोर्चाचा इशारा!

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे :** वाशिम दि.२३ एप्रिल संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग बांधवांना तहसील कार्यालयांकडून पाठविण्यात आलेल्या नोटीस व सुरू असलेल्या कार्यवाहीविरोधात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर आज दुपारी २.२० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून संबंधित कारवाई तात्काळ थांबविण्याची मागणी करण्यात आली.

जिल्हाभरात संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे मोठ्या प्रमाणावर दिव्यांग लाभार्थी असून शासनाकडून मिळणारे अनुदान हेच त्यांचे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे. मात्र, अलीकडे तहसील स्तरावरून पाठवण्यात आलेल्या नोटीसांमुळे या लाभार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. "आता न्याय कुणाकडे मागायचा आणि जगायचे कसे?" असा गंभीर प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला असल्याचे




निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी युवा सेना संपर्कप्रमुख गोरख पाटील बोरकर यांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत, "दिव्यांग बांधवांवर अन्याय सहन केला जाणार नाही," असा स्पष्ट इशारा दिला. तसेच गोरख पाटील बोरकर यांनी सांगितले की, शासनाच्या धोरणांमुळे लाभार्थ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

शासनाच्या पोर्टलवर बहुतांश दिव्यांगांनी UDID कार्डची केवायसी पूर्ण केली असून त्यांना सध्या तात्पुरती अपंगत्व प्रमाणपत्रे मिळाली आहेत. ही प्रमाणपत्रे कायमस्वरूपी करण्याची मुदत अद्याप संपलेली नसतानाही पोर्टलवरून प्रक्रिया होत नसल्याने लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अनेक जण शासकीय अनुदानापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

युवा सेना संपर्कप्रमुख गोरख पाटील बोरकर यांनी पुढे सांगितले की, "शासनाने तात्काळ पोर्टलमध्ये सुधारणा करून दिव्यांग बांधवांना दिलासा द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल."

या पार्श्वभूमीवर शासनाने तात्काळ पोर्टलमध्ये आवश्यक सुधारणा करून दिव्यांग बांधवांना दिलासा द्यावा,

> **"दिव्यांग बांधवांवर अन्याय करणारे कोणतेही निर्णय आम्ही सहन करणार नाही. शासनाने तात्काळ चुकीचे निर्णय मागे घेऊन लाभार्थ्यांना न्याय द्यावा. अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल."**
> **— गोरख पाटील बोरकर**
> **(युवा सेना संपर्कप्रमुख)**

तसेच शासन निर्णय क्रमांक विसयो-2025/प्र.क्र.92/विसयो दि. 27 मार्च 2026 तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा येत्या सात दिवसांत संपूर्ण वाशिम जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

हे निवेदन रिसोड तालुका उपप्रमुख गजानन देशमुख व युवा सेना संपर्कप्रमुख गोरख पाटील बोरकर यांनी उपजिल्हाधिकारी, दिव्यांग कल्याण मंत्रालय मुंबई, आरोग्य विभाग तसेच संबंधित लोकप्रतिनिधींना सादर केले आहे.

# संत गाडगे बाबा आणि अंधश्रद्धेबाबत विचार

**दैनिक युवक आधार**
**डॉ सुनिल भगत नागपूर**

गाडगे बाबा म्हणजे 'चालतं-बोलतं विद्यापीठ'. त्यांनी पोथ्या वाचल्या नाहीत, पण समाजाचा खरा रोग ओळखला. त्यांच्या मते *"अंधश्रद्धा ही गरिबी आणि गुलामगिरीची बहीण आहे."



**1. गाडगे बाबांचा मुख्य सिद्धांत – 'देव दगडात नाही, तो माणसात आहे'**

त्यांच्या कीर्तनातला हा सर्वात प्रसिद्ध संदेश:

"देवळात देव शोधू नका, देव माणसात आहे. भुकेलेल्याला जेऊ घाला, नंग्याला कापड द्या, हाच खरा धर्म."

म्हणजे दगडाच्या मूर्तीवर दूध ओतण्यापेक्षा, भुकेल्या लेकराला दूध पाजा. हाच अंधश्रद्धेवर पहिला घाव.

**2. बुवाबाजी आणि कर्मकांडावर हल्लाबोल**

गाडगे बाबा कीर्तनात बुवांची थेट नक्कल करायचे. लोक हसत-हसत शहाणे व्हायचे.

- *अंगात येणे*: "अंगात देव येतो म्हणता, मग तुमच्या बायकोच्या अंगात का येत नाही? तुमच्या लेकराच्या अंगात का येत नाही? फक्त गरिबाच्याच अंगात का येतो?"

- *नवस-सायास*: "नवसाने पोरं होत असती तर दवाखाने बंद पडले असते. डॉक्टर शिका, हाच खरा नवस."

- *करणी-बाधा*: "उतारा-मतारा, लिंबू-मिरची रस्त्यावर टाकून लोकांचे आजार बरे होत नाहीत, तर रोग वाढतात. ते उचलणाऱ्या भंग्याला रोग होतो."

- *जादूटोणा*: "जगात जादू नावाची वस्तूच नाही. आहे फक्त हातचलाखी. भोळ्या लोकांना फसवण्याचा धंदा आहे."

**3. स्वच्छता हाच खरा धर्म – अंधश्रद्धेवर उपाय**

गाडगे बाबा गावात आले की पहिले झाडू हातात घ्यायचे. गाव झाडून स्वच्छ करायचे आणि म्हणायचे:

"रोगराई झाडूने जाते, अंगाऱ्याने नाही. गाव स्वच्छ ठेवा, दवाखाना बांधा, शाळा बांधा. देवळं पुष्कळ झाली."

त्यांनी आयुष्यभर धर्मशाळा, शाळा, गोरक्षण, अनाथालये बांधली. एकही देऊळ बांधले नाही. हाच त्यांचा अंधश्रद्धेला कृतीतून दिलेला उत्तर.

**4. 10 प्रसिद्ध उपदेश – जे अंधश्रद्धेच्या विरोधात होते**

1. भुकेलेल्यांना अन्न द्या.
2. तहानलेल्यांना पाणी द्या.
3. उघड्यांना कपडे द्या.
4. गरीब मुलांना शिक्षणासाठी मदत करा.
5. रोग्यांना औषधोपचार करा.
6. बेघरांना आसरा द्या.
7. आंधळे, पांगळे, रोगी यांना मदत करा.
8. बेकारांना रोजगार द्या.
9. पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय द्या.
10. *गरिबांच्या लेकरांना शिकवा, हीच खरी धर्मसेवा.*

यात कुठेही 'पोथी वाचा, उपवास करा, नवस फेडा' असे सांगितले नाही.

**5. आज गाडगे बाबा असते तर काय म्हणाले असते?**

"अरे मायबाप हो, 21व्या शतकात मोबाईलवरून चांदावरचा फोटो बघता, अन इथं लिंबू-मिरचीला भिता? जो पैसा तुम्ही बुवाला, नवसाला, उताऱ्याला देता, त्यातून एका गरिबाच्या पोराचं शिक्षण करा. तोच तुमचा देव तुम्हाला पावेल."

**सारांश – गाडगे बाबांचा मंत्र**

"देव धर्माच्या नावावर पोट भरणाऱ्यांपासून सावध राहा. हाताला काम द्या, पोटाला घास द्या, डोक्याला विचार द्या. बाकी सगळं थोतांड आहे."

बाबासाहेबांनी जे 'शिका' सांगितले, तेच गाडगे बाबांनी 'शाळा बांधा' म्हणून कृतीतून दाखवले. दोघांचाही शत्रू एकच –अंधश्रद्धा

देव दगडात नाही, देव माणसात आहे! गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला!

**उमेश चित्ते**
**७७५८८४७१४३**

# गोदा ते नर्मदा' यात्रा: सिल्लोडमध्ये जलकलश पूजन

## आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते कलश सुपूर्द

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आयोजित 'गोदा ते नर्मदा' यात्रेच्या पार्श्वभूमीवर, सिल्लोड येथील पूर्णा व वाघुर नदीचे जल एकत्रित करून त्याचे पूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. स्थानिक शिवसेना भवनस्थित जनसंपर्क कार्यालयात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात, जलकलश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला.




जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून राज्यातील विविध पवित्र नद्यांचे जल नर्मदा नदीत अर्पण करण्याचा हा उपक्रम आहे. या यात्रेमुळे राज्यातील सांस्कृतिक व धार्मिक ऐक्य वृद्धिंगत होऊन पर्यावरण व जलसंवर्धनाचा संदेश दिला जाणार असल्याचे आमदार सत्तार यांनी यावेळी स्पष्ट केले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, जि. प. सदस्य देविदास पालोदकर, कृउबा समितीचे संचालक सतीश ताठे, पं. स. चे माजी उपसभापती अजित सेठ बागवान, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, अजिंठा सरपंच नजीर अहमद, सोनसिंग चव्हाण, तसेच जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता अभय शेळके, शाखा अभियंता प्रीतम राठोड आणि शिवाजी बुचाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नांदेड जिल्हा बुरुड समाज संघटनेचा मराठवाडा स्तरीय आठवा सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : नांदेड जिल्हा बुरुड समाज संघटनेतर्फे दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी नांदेड येथे मराठवाडा विभाग स्तरीय आठवा सामुदायिक विवाह सोहळा मोठ्या उत्साहात व थाटामाटात पार पडला. या सोहळ्यास महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील पदाधिकारी तसेच इतर राज्यांतील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भव्य व आकर्षक अशा अनुसया गार्डन मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास समाज बांधवांची प्रचंड गर्दी झाली होती. या सोहळ्याचे आयोजन नांदेड जिल्हा बुरुड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. मोहनराव पटकुटवर व सरचिटणीस श्री. संजय हळदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.यावेळी मोहनराव वासमवार, साईनाथ गुडमलवार, आनंद गुडमलवार, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रवि मांजरे, युवा



जिल्हाध्यक्ष साईदास नागेश्वर, मनिषभाऊ जोरगेवार, स्वप्निल गुडमलवार, बालाजी देवके, संतोष सुनेवाड, कैलास सुनेवाड तसेच महिला जिल्हाध्यक्षा सौ. मनिषाताई नागेश्वर, सौ. मंगलाताई गुडमलवार आणि इतर पदाधिकारी, युवा व महिला कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.या सामुदायिक विवाह सोहळ्याला समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी आपल्या मनोगतात या मेळाव्याचे कौतुक करत याला एक आदर्श उपक्रम असल्याची नोंद केली.

# शिंदे गुरुजी दूरदृष्टीचे शिक्षण तज्ज्ञ होते - डॉ शहाजी चंदनशिवे

## (रा. गे. शिंदे महाविद्यालयात पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम संपन्न रा गे शिंदे गुरुजींना अभिवादन.)

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे/धाराशिव**
-श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिवचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी कै. रा. गे. शिंदे गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त परंडा येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेशकुमार माने होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून परंडा तहसीलचे नायब तहसीलदार विजय बाडकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नायब तहसीलदार विजय बाडकर यांच्या हस्ते शिंदे गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. भाऊसाहेब दिवाने,



कार्यालयीन अधीक्षक सौ. पद्मा शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा स्टाफ सेक्रेटरी डॉ शहाजी चंदनशिवे तसेच महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. शहाजी चंदनशिवे यांनी आपल्या मनोगतात शिंदे गुरुजींच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. ते म्हणाले की, "शिंदे गुरुजी हे दूरदृष्टीचे शिक्षणतज्ज्ञ होते. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे, त्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने त्यांनी परंडा येथे 'न्यू कॉलेज'ची स्थापना केली. आज हेच महाविद्यालय शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय या नावाने नावारूपाला आले आहे."

ते पुढे म्हणाले की, "गुरुजींचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी संस्थेचे सचिव संजय निंबाळकर यांनी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली आहे. गुरुजींचे विचार समाजाभिमुख होते. त्यांनी उभारलेले हे शिक्षण संकुल केवळ शिक्षण देणारे केंद्र नसून सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आहे." त्यांच्या आदर्शांचा वारसा जपण्याचा निर्धार आपण केला पाहिजे .

आज संस्थेतील पदाधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी गुरुजींच्या विचारांचे आत्मसात करून त्यांनी दाखवलेल्या मार्गावर कार्यरत आहेत, हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

शेवटी उपस्थितांनी शिंदे गुरुजींना भावपूर्ण अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# देवणीत संत-महापुरुषांच्या विचारांचा जागर

## महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी शहरातील विरक्त मठ येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास भव्य दिव्य मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात काढण्यात आली. या मिरवणुकीत अक्का महादेवी, राजा भगीरथ, छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, संत रोहिदास, महर्षी वाल्मिकी, संत गाडगे बाबा महाराज, स्वामी विवेकानंद तसेच संत सेवालाल महाराज अशा अकरा संत-महापुरुषांच्या प्रतिमा सजवलेल्या रथामागे अकरा वाहनांवर ठेवण्यात आल्या होत्या.

या वेळी शहरातील महात्मा बसवेश्वर समितीचे सर्व पदाधिकारी, व्यापारी वर्ग, विविध कार्यकारी सोसायट्यांचे चेअरमन व संचालक मंडळ, तसेच सर्व समाजातील नागरिक व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण शहरात भक्तीमय व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या मिरवणुकीत संत-महापुरुषांच्या विचारांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. महात्मा बसवेश्वर यांनी दिलेला समता, श्रमाची प्रतिष्ठा व "कायक कैलास" हा संदेश; अक्का महादेवी यांचे वैराग्य व स्त्रीस्वातंत्र्याचे विचार; राजा भगीरथ यांची लोककल्याणासाठीची तपश्चर्या; तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य, शौर्य व सर्वधर्म समभावाचे तत्त्व या मिरवणुकीतून जनतेपर्यंत पोहोचविण्यात आले.

तसेच अहिल्यादेवी होळकर यांची न्यायप्रिय व लोकहितवादी कारभारशैली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समानतेचा व शिक्षणाचा संदेश, अण्णाभाऊ साठे यांचे कष्टकरी वर्गासाठीचे कार्य आणि संत रोहिदास यांची समतेची बंधुभाव शिकवण यांचा प्रभावही या सोहळ्यात जाणवला.

यासोबतच रामायण कवी महर्षी वाल्मिकी यांनी दिलेली आदर्श जीवनमूल्ये, संत गाडगे बाबा महाराज यांची स्वच्छता व समाजसेवा, स्वामी विवेकानंद यांचे युवकांना राष्ट्रभक्ती आणि आत्मविश्वास प्रेरणा देणारे विचार आणि संत सेवालाल महाराज बंजारा समाजाचे पूज्य संत समाजसंघटनाची शिकवण यांचे दर्शन घडले.

देवणी शहरात एकही महापुरुषाचा पुतळा नसला तरी त्यांच्या विचारांचे पालन व आचरण मोठ्या प्रमाणात केले जाते, हे या भव्य मिरवणुकीतून स्पष्ट झाले. हा सोहळा देवणी शहरात सामाजिक ऐक्य, प्रेरणा आणि संत-महापुरुषांच्या विचारांचा जागर करणारा ठरला.

# खरीप हंगामासाठी सज्जता! शेतकरी प्रश्नांवर रिसोडमध्ये व्यापक मंथन

## आमदार अमितभाऊ झनक यांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी कार्यालय, रिसोड येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा सभेला २३ एप्रिल २०२६ रोजी विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार अमितभाऊ झनक यांनी उपस्थित राहून शेतकरी व कृषी विकासाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वालके (वाशिम) यांनी शेतकरी व कृषी विकासासंदर्भात महत्त्वपूर्ण विचार मांडले. तसेच तालुका कृषी अधिकारी तावरे साहेब यांनी विविध शासकीय कृषी योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमात त. बबनराव




गारडे (खरेदी-विक्री संघ उपाध्यक्ष), व्यापारी मदन सेठ बगडीया, संदीप आना जिरवनकर, भारत आप्पा जिरवनकर, रवि दादडे, नगरसेवक सचिन ईपर, तालुका अध्यक्ष रामेश्वर देवकर, शिवाजी काकडे (पंचायत समिती सदस्य), पुरुषोत्तम तोष्णीवाल, रावसाहेब देशमुख तसेच रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक अर्जुन पाटील खरात आणि विनोद बोडखे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेत आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बियाणे, खतांची उपलब्धता, कीड-रोग व्यवस्थापन, पाणी नियोजन तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः शेतकरी प्रश्न, योजनांची अंमलबजावणी आणि स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी आपापले विचार मांडत कार्यक्रमाची उंची वाढवली.कार्यक्रमाचे

> **"शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून पीक उत्पादन वाढवावे. शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेत शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. प्रशासन व शेतकरी यांच्यात समन्वय राहिल्यास खरीप हंगाम अधिक यशस्वी ठरेल."**
>
> **— आमदार अमितभाऊ झनक**

आयोजन उत्तम पद्धतीने करण्यात आले होते. तालुक्यातील विविध भागांतील शेतकरी, कृषी सहाय्यक, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

# श्रीवर्धनमध्ये पाणी प्रश्न पेटला! निकृष्ट कामे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांनी प्रशासन गोत्यात; १ मे रोजी शिवसेनेचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन प्रतिनिधी** : "पाणी आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं," अशी आक्रमक भूमिका घेत श्रीवर्धनमधील पाणी प्रश्नाने आता रौद्र रूप धारण केले आहे. शहरातील कोलमडलेली पाणीपुरवठा व्यवस्था, वारंवार फुटणाऱ्या पाईपलाईन आणि प्रशासनाचा निर्ढावलेला कारभार यांविरोधात आता थेट रणशिंग फुंकण्यात आले आहे. १ मे – महाराष्ट्र दिनी श्रीवर्धन नगरपरिषदेसमोर होणाऱ्या या लाक्षणिक उपोषणामुळे शहरभर संतापाची लाट उसळली आहे.पाणी योजनेचा खेळखंडोबा; जनतेच्या पैशाची होळी?श्रीवर्धन



शहरासाठी राबवण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा खळबळजनक आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे. नवीन पाईपलाईन टाकताना केलेल्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या कामामुळे शहरात जागोजागी गळती लागली आहे. "लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असताना, नागरिकांच्या नळाला मात्र दोन-दोन दिवस ठणठणाट असतो, हा कसला विकास?" असा संतप्त सवाल शिवसेनेच्या वतीने विचारण्यात आला आहे.गढूळ पाणी की 'विष'? नागरिकांच्या आरोग्याशी खेळ! केवळ पाण्याचा तुटवडाच नाही, तर पुरविले जाणारे पाणी हे पिण्यायोग्य नसून अत्यंत अशुद्ध आणि गढूळ आहे. प्रशासनाच्या या बेजबाबदारपणामुळे शहरात साथीचे रोग पसरण्याची भीती निर्माण झाली असून, जनतेच्या जीवाशी हा खेळ खेळला जात असल्याची टीका होत आहे. विशेषतः महिला वर्गाला पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने संताप अधिकच तीव्र आहे. प्रशासनाला 'जाहीर नोटीस' – आता माघार नाही!नगरसेवक व गटनेते देवेंद्र पांडुरंग भुसाणे यांनी प्रशासनाला ठणकावून सांगितले आहे की, वारंवार निवेदने देऊनही झोपेचे सोंग घेणाऱ्या अधिकाऱ्यांना आता जनतेचा हिसका दाखवण्याची वेळ आली आहे. या आंदोलनात नगरसेवक संतोष वेश्वीकर, नगरसेविका सलोनी स्वरूप मोहित आणि शहरप्रमुख सावन तवसाळकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार आहेत. जर या उपोषणानंतरही प्रशासनाने तातडीने सुधारणा केली नाही, तर हे आंदोलन अधिक उग्र स्वरूप धारण करेल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

**आंदोलनाची रूपरेषा:**

ठिकाण: श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय.

दिनांक: १ मे २०२६ (महाराष्ट्र दिन).

वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० पर्यंत.

# श्री राजपूत करणी सेनेचे चिंतन-मंथन शिबीर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : राजपुत समाजाच्या दुर्लक्षित प्रश्नांवर चर्चा करून ठोस निर्णायक भूमिका घेण्यासाठी श्री राजपूत करनी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महिपाल सिंह मकराणा यांच्या नेतृत्वाखाली मुंबई मराठी पत्रकार संघ येथे चिंतन-मंथन शिबीर झाले. महाराज्य प्रदेश अध्यक्ष श्याम सिंह ठाकूर व इतर पदाधिकारी यावेळी उपस्थितीत होते.

महाराष्ट्र राज्याच्या सर्व जिल्ह्यातील, सर्व विभागातील व सर्व तालुक्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील राजपुत समुदायतील सर्वांना, समाजाच्या असंख्य दुर्लक्षित प्रश्नांवर चर्चा तसेच ठोस




भूमिका घेण्यासाठी एकत्र येण्याचे विनम्र आवाहन या चिंतन शिबिरातून करण्यात आले. महाराष्ट्र करणी सेना प्रमुख अजय सिंह सेंगर यांनीही आरक्षण व इतर महत्वाच्या विषयावर आपली भूमिका चिंतन शिबिरात मांडली.

समाजातील सुशिक्षित बेरोजगार, समाजातील युवांवर वाढते व्यसनाचे संकट, समाजातील व वर्तमान परस्थितीतील आरक्षणाचे राजकारण संपले तरच जाती पातीचे राजकारण संपेल असे महिपालसिंह जी मकराणा यांनी सांगितले. यावेळी श्याम सिंह ठाकूर म्हणाले सरकारने जर आमच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला.

# लॉजीस्टिक यार्ड परिसरात वाहतूक कोंडी

## नियोजनातून तोडगा काढण्याची गरज




**दैनिक युवक आधार**

**पनवेल : वार्ताहर** : कोन–सावळा परिसरातील लॉजिस्टिक यार्डकडे जाणाऱ्या मार्गावर सध्या वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असली, तरी तिच्या मुळाशी वाढती औद्योगिक हालचाल आणि बंदरातून येणाऱ्या मालवाहतुकीचा वाढलेला ताण असल्याचे स्पष्ट होत आहे. जेएनपीटी पोर्टमधून मोठ्या प्रमाणात एकाचवेळी मालाची आवक होत असल्याने रस्त्यावर रहदारी करताना ट्रक व ट्रेलरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

उपलब्ध पार्किंग सुविधांचा अभाव आणि अपुऱ्या रस्त्यांमुळे पळस्पे ते सावळा परिसरातील लॉजिस्टिक यार्डकडे जाणाऱ्या वाहनांना नाईलाजास्तव रस्त्यावरच थांबावे लागत आहे. यामुळे वाहतूक कोंडी होत असली तरी ही परिस्थिती वाहतूक साखळीतील नियोजनाच्या कमतरतेकडे निर्देश करणारी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी ,प्रांत, तहसील, ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन, पोर्ट प्राधिकरण, वाहतूक पोलीस, आरटीओ विभाग, ट्रान्सपोर्ट कंपन्या आणि वाहनचालक ,CHA ,CFS अशा सर्व घटकांसमोर एक मोठे आव्हान उभे ठाकले आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्र येत समन्वयाने काम केल्यास या समस्येवर निश्चित तोडगा निघू शकतो, असा विश्वास यार्ड संचालक व्यक्त करत आहे.

तज्ज्ञांच्या मते, स्वतंत्र व सुसज्ज ट्रक टर्मिनल, पर्यायी रस्ते मार्गांची निर्मिती, तसेच वाहतूक नियंत्रणासाठी विशेष समिती गठीत करणे अत्यावश्यक आहे. या समितीत प्रशासनासोबतच लॉजिस्टिक क्षेत्रातील प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिकांचाही सहभाग असावा, जेणेकरून प्रत्यक्ष परिस्थितीनुसार प्रभावी उपाययोजना करता येतील.सध्या नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे अडचणींचा सामना करावा लागत असला, तरी योग्य नियोजन आणि समन्वयातून ही समस्या सोडवून परिसरातील वाहतूक सुरळीत करण्याचा मार्ग निश्चितच खुला होऊ शकतो पण तो पर्यंत स्थानिक नागरिकांच्या जिवावर टांगती तलवार लटकत असल्याची चिंताजनक परिस्थिती समोर येत आहे.

# इंगळे घराण्याची गौरवगाथा

शिवरायांची सासुरवाडी : करवंड (ता. चिखली) इंगळे घराण्याची गौरवगाथा - स्वराज्याच्या इतिहासातील उज्ज्वल अध्याय.इतिहास म्हणजे केवळ राजसत्ता बदलण्याची नोंद नव्हे. इतिहास म्हणजे त्या सत्तांमागे उभे राहिलेले घराणी, कुटुंबे,त्याग,निष्ठा,पराक्रम आणि स्वाभिमान यांचा अखंड प्रवाह होय. महाराष्ट्राच्या स्वराज्याच्या इतिहासात अनेक सरदार,देशमुख, पाटील,आणि वजनदार घराणी पुढे आली, परंतु काही घराणी अशी असतात की त्यांचे योगदान केवळ युद्धभूमीपुरते मर्यादित राहत नाही,तर ते राजकीय,सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर इतिहास घडवतात.अशाच एका तेजस्वी आणि गौरवशाली घराण्याचे नाव म्हणजे - बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील करवंड गावातील इंगळे घराणे.हे घराणे शिवपूर्व काळापासून ते शाहू महाराजांच्या काळापर्यंत अखंडपणे इतिहासाच्या केंद्रस्थानी राहिले. आदिलशहाच्या दरबारात वजनदार स्थान मिळवूनही स्वराज्यवादी विचारांशी निष्ठा राखणारे,आणि शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील स्वराज्यासाठी तलवार उचलणारे हे घराणे आजही "शिवरायांची सासुरवाडी" या गौरवपूर्ण ओळखीने ओळखले जाते. करवंड गाव : इतिहासाने नटलेली भूमी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात वसलेले करवंड हे गाव विदर्भाच्या पश्चिम सीमेवर वसलेले एक प्राचीन व ऐतिहासिक केंद्र आहे. पूर्वी या गावास बावन बुर्जी असे संबोधले जात असे.याचे कारण म्हणजे गावाभोवती उभारलेले ५२ बुरुज,आणि त्या बुरुजांच्या संरक्षणाखाली असलेली इंगळे घराण्याची गढी.या ५२ बुरुजांशी संबंधित ५२ गावांची



वतनदारी इंगळे घराण्याकडे होती,ही बाब या घराण्याच्या राजकीय व सामाजिक सामर्थ्याची साक्ष देते.आज जरी अनेक बुरुज ढासळलेल्या अवस्थेत असले, तरी त्यांचे भग्नावशेष अजूनही इतिहासाची साक्ष देत उभे आहेत.

करवंड हा परिसर अहमदनगर आणि बीजापूर (आदिलशाही) सत्तांमधील संघर्षाच्या सीमारेषेवर होता.त्यामुळे येथे गढ्या,वाडे,सैनिकी तळ आणि सरदारांचे निवासस्थान उभारले गेले. इंगळे घराण्याची गढी ही त्याच लष्करी परंपरेचा जिवंत पुरावा आहे.

**शासनाची उदासीनता : एक गंभीर वास्तव**

इतका मौल्यवान ऐतिहासिक वारसा असतानाही, दुर्दैवाने आज इंगळे गढी आणि बावन बुर्जी परिसर शासनाच्या दुर्लक्षामुळे उपेक्षित राहिला आहे. गेल्या दोन–तीन वर्षांपासून आपण आणि आपले सहकारी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा करत आहोत. निवेदने,भेटी,वृत्तपत्रातील बातम्या,प्रत्यक्ष पाहणी सर्व प्रयत्न करूनही आजतागायत कोणतीही ठोस कृती शासनाकडून झालेली नाही.ही उदासीनता केवळ एका गावाबाबत नाही,तर संपूर्ण स्वराज्य इतिहासाबाबतची अनास्था दर्शवते.

इंगळे घराण्याची उत्पत्ती व सामाजिक स्थान.करवंडचे इंगळे घराणे शिवपूर्व काळापासून अस्तित्वात होते.आदिलशाही काळात हे घराणे "वजनदार घराणे" म्हणून ओळखले जात असे.राजकीय,सामाजिक व लष्करी क्षेत्रात या घराण्याचे वर्चस्व होते.त्यांना देशमुखी,पाटीलकी,सरदारकी आणि "जंगबहाद्दूर" ही गौरवशाली उपाधी प्राप्त झाली होती.परंतु या घराण्याचे खरे वैशिष्ट्य म्हणजे स्वराज्यनिष्ठा. आदिलशाही दरबारात पदे भूषवतानाही त्यांनी शहाजीराजे भोसले यांच्याशी प्रामाणिक निष्ठा ठेवली आणि पुढे शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेसाठी आपले सर्वस्व अर्पण केले.इंगळे घराण्याचा लष्करी पराक्रम

शहाजीराजे भोसले आणि पुढे शिवाजी महाराजांच्या मोहिमांमध्ये इंगळे घराण्यातील अनेक सरदारांनी आपले पराक्रम गाजवले.इतिहासात उल्लेखनीय ठरलेली काही नावे सरदार शिवाजीराव इंगळे,बहीरजी नाईक इंगळे,कात्याजी (काटुजी) इंगळे,

विशेषतः प्रतापगडावरील अफजलखान वधाच्या प्रसंगी,इंगळे सरदारांनी दाखवलेला पराक्रम स्वराज्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला आहे.शिवाजी महाराजांनी स्वतः अशा निष्ठावंत योद्ध्यांचा गौरव केला.ही बाब इंगळे घराण्याच्या विश्वासार्हतेची साक्ष देते.

राजवंशीय नाती : शिवरायांची सासुरवाडी इंगळे घराण्याचा इतिहासातील सर्वात गौरवशाली अध्याय म्हणजे गुणवंताबाईसाहेब शिवाजी महाराजांच्या पत्नी दीपाबाईसाहेब व्यंकोजीराजे (शिवरायांचे सावत्र बंधू) यांच्या पत्नी या दोन विवाहांमुळे करवंड गाव थेट भोसले राजघराण्याशी जोडले गेले.यामुळेच करवंडला "शिवरायांची सासुरवाडी" ही ऐतिहासिक ओळख प्राप्त झाली.ही नाती केवळ कौटुंबिक नव्हती,तर त्यातून राजकीय,लष्करी आणि सामाजिक ऐक्य निर्माण झाले,ज्यामुळे स्वराज्य अधिक बळकट झाले.

इंगळे गढी : इतिहासाचे जिवंत स्मारक करवंड येथील इंगळे गढी ही मराठा काळातील लष्करी वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.पाषाण व चुन्याच्या बांधकामातील ही गढी केवळ निवासस्थान नव्हे, तर एक सशक्त सैनिकी ठाणे होती. आजही तटबंदीचे अवशेष भक्कम दरवाजे,अंगणातील जलाशय,गुप्त मार्गांचे चिन्ह हे सर्व इतिहासाची साक्ष देतात. आजची पिढी आणि पुढील दिशा आज इंगळे घराण्याचे वारस राजे हरीरुद्र इंगळे तंजावरहून आपल्या मूळ गावी करवंड येथे वास्तव्यास आले असून, वारशाचे जतन करण्यासाठी कटिबद्ध आहेत.अरविंद बापू इंगळे यांची या कार्यातील धडपड विशेष उल्लेखनीय आहे.

बावन बुर्जी बचाव कृती समितीच्या माध्यमातून लवकरच राजे हरीरुद्र इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन पुढील आंदोलनात्मक व संवर्धनात्मक दिशा ठरवली जाणार आहे.अंतिम शब्द करवंडची माती इतिहासाने ओथंबलेली आहे,इंगळे घराण्याने स्वराज्याला आधार दिला आहे,आणि त्या गढीच्या भग्न भिंती आजही सांगतात "इथेच शिवरायांची सासुरवाडी होती!" आज हा इतिहास जतन करणे म्हणजे स्वराज्याच्या स्मृती जिवंत ठेवणे होय.


**सुनीलराव जवंजाळ पाटील- 7038894078**
**बावन बुर्जी बचाव कृती समिती,बुलढाणा.**

# सौ .नेहा भूषण पारंगे यांची समाजकल्याण व आरोग्य समिती सदस्यपदी निवड

## पक्ष श्रेष्ठी व मतदारांच्या विश्वासावर खरे उतरू – भूषण पारंगे

**दैनिक युवक आधार**

**खालापूर वार्ताहर** : वासांबे जिल्हा परिषद गटातून विजयी झालेल्या उमेदवार सौ. नेहा भूषण पारंगे यांची नुकतीच रायगड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण व आरोग्य समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेमधील विविध खातेवाटप जिल्हाध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.



या खातेवाटपामध्ये वासांबे येथील जिल्हा परिषद सदस्या नेहा पारंगे यांना समाजकल्याण व आरोग्य या महत्त्वाच्या समितीत काम करण्याची संधी मिळाली आहे. या माध्यमातून त्या वासांबे विभागातील सामाजिक कल्याण आणि आरोग्यविषयक प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित करून विविध समाजोपयोगी विकासकामे मार्गी लावणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.दरम्यान, त्यांच्या या निवडीबद्दल वासांबे विभागातील भाजप कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत जल्लोष साजरा केला असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# नेवाशातील बिघडलेल्या कायदा सुव्यस्थामध्ये सुधारणा करा

## नेवासा काँग्रेसचा पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलनाचा ईशारा

**दैनिक युवक आधार**

**(नेवासा प्रतिनिधी)** : नेवासा तालुक्यातील वाढते अवैध धंदे, पोलीस विभागाची आकार्यक्षमता व भ्रष्टाचार याविरोधात आज काँग्रेसने नेवासा पोलीस निरीक्षकाना निवेदन दिले. सविस्तर वृत्त असे की,नेवासा तालुक्यात अवैध धंद्याच्या माध्यमातून दोन नंबरवाल्यानी डोके वर काढले आहे. यात प्रवरा, गोदावरी नदीतून वाळू उपसा ज्यामुळे गुन्हेगारी वाढली आहे, गल्लोगल्ली सुरु असणारा मटका व्यवसाय, राजरोसपणे सुरु असणारा गुटखा व्यवसाय, अवैध दारू पाडणे व विक्री,गांजा विक्री,श्रीरामपूर नेवासा व नगर -संभाजी नगर महामार्गवरील रोड-रोबरी, यात डिजल चोरी, सोने दागिने चोरी, या व्यतिरिक्त लॉजिंगवर चालणारा वेश्या व्यवसाय असे अनेक अवैध धंद्यानी तालुक्यात जोर पकडला आहे. तर यावर पोलीस प्रशासनाने अंकुश ठेवण्याऐवजी पोलीसच यात सामील असल्याची चर्चा तालुक्यात आहे.पोलिसांचे गुन्हेगारांशी आर्थिक हितसंबंध असून यातून गुन्हेगारांचे फावत आहे. तर नेवासा पोलीस निरीक्षकांची नेवासा पोलीस स्टेशनवर पकड राहिलेली नाही ही चर्चा तालुक्यात असून कर्मचारी निरीक्षकाचे ऐकत नाही अशीही चर्चा आहे. गुन्ह्याचा आलेख कमी करण्यासाठी पोलीस ठाण्याकडून गंभीर गुन्ह्यात देखील फक्त एनसी दाखल करून गुन्हेगारांना अभय देण्यात येत आहे. यामुळे गुन्ह्याचा आलेख उंचावला आहे.याबाबत नेवासा काँग्रेस कडून दखल घेत तात्काळ कारवाई करून सर्व अवैध धंद्याना आळा घालावा व तालुक्यातील कायदा सुव्यवस्था मध्ये सुधारणा करावी अशी मागणी निवेदणाद्वारे करण्यात आली. येत्या आठवडा भरात याबाबत कारवाई न झाल्यास पोलीस प्रशासना विरोधात नेवासा पोलीस ठाण्यासमोर काँग्रेस पक्षाकडून निदर्शने, धरणे आंदोलन करण्यात येईल असा ईशारा देण्यात आला तसें लेखी निवेदन पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना देण्यात आले. यावेळी प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे पोलीस प्रशासनातील भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसाला न्याय न मिळाल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परंतु काँग्रेस पक्ष सर्व सामान्याच्या पाठीशी आहे त्यासाठी लढा देखील देणार. काँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी पोलिसांचे गुन्हेगाराशीं आर्थिक हितसंबंध असल्यामुळे गुन्हेगार व गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे.त्यामुळे पोलीस विभाग भ्रष्टाचार मुक्त होणे गरजेचे आहे. निवेदनावेळी युवा नेते हरीश चक्रनारायण, महिला काँग्रेसच्या शोभा पातारे, उपाध्यक्ष सतीश तऱ्हाळ,द्वारक जाधव, संजय वाघमारे, गोरक्षनाथ काळे,संजय होडगर,आदिसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हॉर्मुझची खेळी : या अस्थिर युद्धविरामानं साधलं तरी काय?

मध्यपूर्वेत एक अस्थिर युद्धविराम आकार घेत असतानाच, संघर्षाचा निर्णायक शेवट हे एक मृगजळ होते, अशीच चर्चा आता सुरू झाली आहे. अमेरिका आणि इराण ज्या निष्कर्षावर पोहोचले आहेत, त्यातून प्रादेशिक राष्ट्रांना काय हवं आहे, इराणला काय हवं आहे, इस्त्रायलला काय हवं आहे आणि वॉशिंग्टनला काय हवं आहे, यांमधील एक मोठी दरी उघड होते. हे केवळ अंशात्मक फरक नाहीत, तर ते स्वरूपात्मक फरक आहेत आणि कोणताही तात्पुरता युद्धविराम त्यावर फार काळ पांघरूण घालू शकत नाही.

इराणने आग्रह धरला होता की त्याला तात्पुरत्या विरामाऐवजी दीर्घकालीन युद्धबंदी हवी आहे. तरीही, युद्धविराम स्वीकारताना, इराणने, नाइलाजाने का होईना, हे ओळखलं आहे की ते चिरस्थायी शांततेची शेवटची संधी गमावण्याचा धोका पत्करत आहेत. इस्लामिक प्रजासत्ताक लष्करीदृष्ट्या कमकुवत झाले आहे, त्याचे प्रतिनिधी दुर्बळ झाले आहेत आणि त्याची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली आहे. उर्वरित शक्तीनिशी वाटाघाटी करण्याची संधी संकुचित होत आहे, आणि इराणला याची जाणीव आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, शक्य तितक्या लवकर युद्धातून बाहेर पडण्याची आपली इच्छा उघडपणे व्यक्त केली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीचा उल्लेख 'इराणची सामुद्रधुनी' असा करण्याची त्यांची घोषणा, मग ती फ्रॉइडियन स्लिप असो किंवा तेहरानला बाहेर पडण्याचा मार्ग देणारा एक सुनियोजित संकेत असो, परिणामकारक ठरली. त्यानंतर इराणने ही सामुद्रधुनी नौकानयनासाठी खुली असल्याची केलेली घोषणा, दोन्ही बाजू टोकाच्या परिस्थितीवरून मागे हटण्यास तयार असल्याचा एक परस्पर संकेत म्हणून याकडे पाहिले गेले.



कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमती आणि संपूर्ण आशियातील बाजाराने केलेली जलद सुधारणा यांनी, ऊर्जेची भूक असलेल्या राष्ट्रांना अपेक्षित असलेली गोष्ट सिद्ध केली. एक सामरिक दिलासा, जरी तो तात्पुरता असला तरी मिळाला. तरीही, हा युद्धविराम नाजूक पायांवर आधारलेला आहे. ट्रम्प यांच्या मध्यस्थीने इस्त्रायली सैन्य आणि लेबनॉनमधील हिजबुल्ला यांच्यातील शत्रुत्वाचा विराम झाला आहे, जो अजूनही एक असा स्फोटक मुद्दा आहे ज्यामुळे संपूर्ण प्रदेश मोठ्या संघर्षात ओढला जाण्याची शक्यता होती.

संपूर्ण प्रदेशात पसरलेल्या इराणच्या हस्तकांच्या जाळयाला पद्धतशीरपणे उद्ध्वस्त करण्याची संधी म्हणून इस्त्रायल या क्षणाकडे पाहत असल्यानं, लेबनॉनमधील आपली मोहीम थांबवण्यास ते नाखूष होते. रणनीतिक गणिताइतकेच प्रादेशिक आर्थिक स्थितीच्या गरजेमुळे प्रेरित होऊन, ट्रम्प यांनी ही नाखुषी डावलली. त्यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांचे अध्यक्षपद हे कमी कालावधीत ऐतिहासिकदृष्ट्या अशक्य गोष्ट साध्य करण्याचे एक साधन म्हणून संकल्पित आहे. म्हणजेच भू-राजकीय स्तरावर वारसा निर्माण करणे हाच त्याचा उद्देश आहे.

संघर्षाच्या वास्तविक स्थितीबद्दलचा संभ्रम अजूनही मोठा आहे. हा युद्धविराम नाजूक स्थितीत आहे, दोन्ही बाजू स्वतःला एका टोकावर ठेवून आहेत आणि शत्रुत्व पुन्हा सुरू होण्याची शक्यता पूर्णपणे कधीच कमी होत नाही. हा असा पहिला युद्धविराम नाही. अगदी अलीकडेच, ८ एप्रिल रोजी, ट्रम्प यांनी त्यांच्या नेहमीच्याच शैलीत युद्धविरामाचा दावा केला होता आणि अजूनही प्रतिकार करणाऱ्या पक्षावर, म्हणजेच इराणवर, जास्तीत जास्त दबाव आणण्यासाठी विजयाचा जल्लोष करण्याची घाई केली होती. हा प्रकार यापूर्वीही झालेला आहे. या पुनरावृत्तीला अधिक विश्वासार्हता देणारी गोष्ट म्हणजे लेबनॉनमधील समांतर युद्धविराम, जो पूर्वी साध्य केलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक संरचनात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण तणाव-निवारण दर्शवतो.

तथापि, हा संघर्ष जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य आणि एक दुर्बळ प्रतिस्पर्धी यांच्यातील द्वंद्वापुरता मर्यादित नाही. त्याचे अनेक स्तर कदाचित मूळ तत्त्वांपेक्षाही अधिक परिणामकारक आहेत. कथनात्मक युद्ध, तांत्रिक स्पर्धा, भू-सामरिक स्थिती, विषम संरक्षण आणि या सर्व आयामांमध्ये समर्थनाची आघाडी तयार करण्याची प्रत्येक देशाची क्षमता. इराणच्या बाजूने, ड्रोन तंत्रज्ञानापासून ते शस्त्रप्रणालींपर्यंतच्या चीन आणि रशियाच्या पाठिंब्याने या स्तरांना अधिक बळकटी मिळाली आहे. ज्यामुळे इराणची प्रतिकार करण्याची क्षमता लक्षणीयरीत्या टिकून राहिली आहे. अमेरिकेच्या बाजूने, चित्र अधिकच निराशाजनक आहे. नाटो मित्र राष्ट्रे, विशेषतः ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली, सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी किंवा अमेरिकेला भौतिक मदत देण्यासाठी कोणत्याही आघाडीत सामील होण्यास उघडपणे नाखूष आहेत. ऐंशी वर्षांहून अधिक काळ टिकलेली ही युती, तिला वारंवार 'कागदी वाघ' ठरवणाऱ्या प्रशासनामुळे स्पष्टपणे तणावपूर्ण झाली आहे. ट्रम्प यांनी पोप फ्रान्सिस यांच्यावर केलेल्या जाहीर हल्ल्यांमुळे इटलीमधील जॉर्जिया मेलोनी यांचे देशांतर्गत स्थानही अस्थिर झाले आहे. ज्यामुळे त्यांना वॉशिंग्टनवर टीका करण्यास भाग पडले, जी त्यांनी पूर्वी टाळली होती आणि त्याबदल्यात त्यांना ट्रम्प यांच्याकडून अपेक्षित तिरस्काराचा सामना करावा लागला. अटलांटिकपार संबंध यापूर्वी कधीही इतके अनिश्चित दिसले नव्हते.

भारतासाठी, यातील धोके तत्काळ आणि बहुस्तरीय आहेत. ऊर्जा सुरक्षा ही सर्वात गंभीर चिंता आहे, जिथे हा संघर्ष भारताच्या सागरी आणि व्यावसायिक हितांच्या धोकादायकपणे जवळ पोहोचला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा बंद केल्यास आखाती तेलावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेत मोठे धक्के बसतील. परंतु व्यापक सामरिक आव्हान कदाचित अधिक परिणामकारक आहे.

अमेरिकेसोबत आपली तांत्रिक आणि संरक्षण भागीदारी पुढे नेण्याच्या, ट्रम्प प्रशासनाच्या अनिश्चिततेचे व्यवस्थापन करण्याच्या, शेजारील प्रदेशात अमेरिका-पाकिस्तान संबंधांमध्ये नव्याने निर्माण झालेल्या सौहार्दाला सामोरे जाण्याच्या आणि अमेरिकेसोबत संभाव्य मोठ्या कराराच्या परिणामांसाठी तयारी करण्याच्या परस्परविरोधी मागण्यांच्या चौकटीत भारताला अमेरिकेसोबतच्या आपल्या संबंधांमध्ये संतुलन साधावे लागेल.

ट्रम्प आणि शी जिनपिंग यांच्या संदर्भात जे पुढील महिन्यात भेटतील अशी अपेक्षा आहे. या अर्थाने, 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' (Strait of Hormuz) हा केवळ एक जलमार्ग नाही. ती सध्याच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील भेगांचे दर्शन घडवणारा एक आरसा आहे; आणि या आरशात असे जग प्रतिबिंबित होते, जिथे निर्णायक निष्पत्ती साध्य करणे अधिकाधिक कठीण होत चालले आहे आणि 'अस्पष्टतेचे व्यवस्थापन' करणे हीच राजनैतिक कौशल्याची सर्वोच्च कला बनली आहे.

**- विवेक मिश्रा**

# मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला-कौशल्याला



योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

**– अपर्णा यावलकर**

# पारंपरिक मराठी पदार्थ आणि त्यांचे फायदे



मराठी खाद्यसंस्कृतीत अनेक पदार्थांचा समावेश आहे. ही खाद्यसंस्कृती केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्याच्या दृष्टीनेही फायदेशीर आहे. ऋतूंनुसार आहारात बदल करणे आणि स्थानिक पदार्थांचा वापर करणे हे आपल्या परंपरेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. मराठी जेवण हे केवळ पोट भरण्याचे साधन नसून ते एक संतुलित 'डाएट' आहे. त्यामुळेआज आपण पारंपरिक मराठी पदार्थ आणि त्यांचे फायदे पाहणार आहोत.

**वरण -भात**

वरण-भात पचायला अत्यंत हलके असते. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाच्या ताटात दररोज वरणभाताचा समावेश असतो. हे पदार्थ पचायला हलके असल्याने लहान मुलांसाठी आणि आजारी व्यक्तीसाठी योग्य आहेत. या पदार्थांतील घटकांमुळे शरीराला झटपट ऊर्जा मिळते. वरण-भातावर साजूक तूप घेतल्याने अन्नाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी होतो आणि अन्नातील पोषक घटक शरीर सहज शोषून घेते.

**भाकरी**

वरण भातासह विविध धान्यांची भाकरी हमखास खाल्ली जाते. यात ज्वारी, बाजरी, तांदूळ आणि नाचणीची भाकरीचा समावेश असतो. ज्वारीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते. ही भाकरी पचायला हलकी असते आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते. तर हिवाळयात बाजरी खाणे फायदेशीर ठरते. यात लोह आणि कॅल्शिअम मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे शरीरात उष्णता टिकून राहते. नाचणी हा कॅल्शिअमचा उत्तम स्रोत आहे. हाडांच्या मजबुतीसाठी आणि मधुमेही रुग्णांसाठी हे एक उत्तम अन्न आहे.

**पिठलं**

भाकरीसोबत पिठलं हे लागतचं.. हरभरा डाळीच्या पिठापासून बनवलेले पिठलं प्रथिनांनी समृद्ध असते. जेव्हा घरात भाजी नसते, तेव्हा हा पदार्थ हमखास बनवला जातो शिवाय हा पदार्थ झटपट देखील होतो.

**थालीपीठ**

सकाळच्या नाश्त्यात थालीपीठ तुम्ही खात असाल तर तुम्ही पोषणमूल्यांचा खजिना शरीरात पोहोचवत आहात. यात अनेक प्रकारच्या डाळी आणि धान्ये एकत्र असल्याने याला पूर्णान्न म्हटले जाते.

**पोहे**

पोहे हे कार्बोहायड्रेट्सचा चांगला स्रोत आहेत आणि त्यात लोहाचे प्रमाणही समाधानकारक असते. लिंबू पिळून खाल्ल्याने त्यातील लोहाचे शोषण शरीरात चांगले होते.

**घावणे**

तांदळाच्या पिठाचे घावणे आणि मुगाच्या डाळीचे धिरडे पचायला हलके असतात.

**चटणी**

पारंपरिक पदार्थांमध्ये जवस, कारळे आणि तीळाची चटणी असते. या चटण्यांमध्ये ओमेगा 3 फॅटी ऍसिड आणि मिनरल असतात, जी त्वचेसाठी गुणकारी असतात.

**भरली वांगी**

भरली वांगी हृदयासाठी उत्तम असतात. यातील फायबर आणि पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

**मसाले भात**

मसाले भातामध्ये वापरल्या जाणाऱ्या हळद आणि इतर मसाल्यांमुळे अन्नाचे पचन चांगले होते तसेच यातील कार्बोहायड्रेट्स शरीराला ताकद देतात.

**कोशिंबीर**

दररोज जेवणात कोशिंबीर खाणे पचनक्रिया सुधारण्यासाठी, वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

यामुळे बद्धकोष्ठता दूर होते, त्वचा निरोगी राहतेआणि शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित राहून उष्णता कमी होते.